
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष तेवीसावे/अंक १/जानेवारी २०२२

## संपादकीय

### मुंबईच्या वस्तुसंग्रहालयाची शतकी वाटचाल

दक्षिण मुंबईत असलेले छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय ही मुंबई शहराची शान आहे. तिला युनेस्कोचे 'हेरिटेज साईट' असे नामांकन मिळाले आहे. पन्नास वर्षांपूर्वी मी जेव्हा मुंबईला पहिल्यांदा आलो तेव्हा हे संग्रहालय पाहायला आवर्जून वेळ काढला होता. त्या वेळेस या संग्रहालयाचे नाव प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम (Prince or Wales Museum) असे होते. त्यानंतर नोकरीच्या निमित्ताने मला मुंबई शहरात राहण्याची संधी मिळाली. या संधीचा उपयोग करून मी या संग्रहालयात अनेकदा जाऊन आलो. आमच्या गावाकडून मला भेटायला येणाऱ्या पाहुण्यांना मी आठवणीने हे संग्रहालय दाखवित असतो. येथे विविध प्रकारच्या वस्तूंचा विपुल साठा उपलब्ध आहे. त्या सगळ्या वस्तू पद्धतशीरपणे लावून ठेवलेल्या असून प्रत्येक वस्तूची थोडक्यात माहिती त्याच्याजवळच उपलब्ध करून दिली आहे. या ज्ञानभांडाराचे मला विलक्षण आकर्षण आहे. काही दिवसांपूर्वी मला असे कळले की, या वस्तुसंग्रहालयाने १० जानेवारी रोजी आपली १०० वर्षे पूर्ण केली आहेत. या निमित्ताने या संग्रहालयाच्या शतकी वाटचालीचा मागोवा घेणे सयुक्तिक ठरेल.

एकोणिसावे शतक संपेपर्यंत ब्रिटिश राजवटीने भारतात चांगलेच पाय रोवले होते. मुंबईच्या सात बेटांचा विकास होऊन मुंबापुरीला आता शहराचे रूप प्राप्त होऊ लागले होते. या वाढत्या शहरात एक चांगले वस्तुसंग्रहालय असावे अशी मागणी जोर धरू लागली होती. मुंबईच्या विकासासाठी धडपड करणारे काही विचारवंत ब्रिटिश राजवटीकडे तशी मागणी करू लागले होते. यात समावेश होता सर फिरोजशहा मेहता, सर इब्राहिम रहमतुल्ला, सर विठ्ठलदास ठाकरसी या मातब्बर समाजसुधारक मंडळींचा. त्यांची ही मागणी रास्तच होती. त्यामुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांनी ती लगेच मान्य केली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच पंचम जॉर्ज यांच्या भारतभेटीचा कार्यक्रम आखण्यात येत होता. त्यांचे औचित्य साधून एका भव्य वस्तुसंग्रहालयाची निर्मिती करण्याचा निर्णय ब्रिटिश सरकारने घेतला. त्यासाठी दक्षिण मुंबईत असलेली एक मोकळी जागा १९०५ मध्येच निश्चित करून तेथे कोनशिला बसविण्यात

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आली. इमारतीचे बांधकाम १९१४ मध्ये पूर्ण झाले. परंतु या ना त्या कारणाने वस्तुसंग्रहालयाचे उद्‌घाटन लांबणीवर पडत केले. याला महत्त्वाचे कारण म्हणजे पहिले महायुद्ध. युद्धामुळे वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीचा उपयोग सैन्यासाठी करण्यात येत असे. युद्ध संपता संपता इन्फ्लुएंझाची साथ सुरू झाली. त्यामुळे १९१८ ते २० या कालावधीमध्ये या इमारतीचा दवाखान्यासारखा वापर केला जात असे. सरतेशेवटी १९२० मध्ये ही इमारत संग्रहालयाच्या विश्वस्तांकडे हस्तांतरित करण्यात आली. त्यानंतर ते वस्तूंची जमवाजमव करू लागले. सरकारी खात्यात असलेल्या वस्तू त्यांनी मिळविल्या. काही लोकांकडे त्यांचा खाजगी साठा होता. तो देखील मिळविण्याचा प्रयत्न विश्वस्त मंडळाने केला. उपलब्ध झालेल्या वस्तू पद्धतशीरपणे लावून १० जानेवारी १९२२ रोजी हे संग्रहालय सर्वांसाठी खुले करण्यात आले. इंग्लंडचे राजे पंचम जॉर्ज हे मूळचे प्रिन्स ऑफ वेल्स होते. त्यांचेच नाव या संग्रहालयाला देण्यात आले.

मागील १०० वर्षांत संग्रहालयात अनेक बदल झाले. मूळची जागा अपुरी पडते असे लक्षात येताच १९३३ मध्ये बाजूलाच नवीन बांधकाम सुरू करण्यात आले. १९४२ ते ४६ या काळात (म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात) सरकारी आदेशानुसार मूळ इमारत रेड क्रॉस या संस्थेकडे सुपूर्द करण्यात आली होती. १९९० मध्ये युनेस्कोने या इमारतीला वारसा इमारत (Heritage Building) असा दर्जा बहाल केला. २००१ मध्ये मध्ये या संग्रहालयाचे मूळचे नाव बदलून छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय असे करण्यात आले. संग्रहालयाची इमारत उत्तम अवस्थेत ठेवल्याबद्दल २०१० मध्ये संग्रहालयाला युनेस्को एशिया पॅसिफिक अवॉर्ड फॉर कमेन्डेबल कॉन्झर्वेशन ऑफ बिल्डिंग (UNESCO - Asis Pacific Award for Commendable Conservation of Building) हा पुरस्कार मिळाला. २०१५ मध्ये एक फिरते संग्रहालय निर्माण करण्यात आले. २०१९ च्या मार्च महिन्यात संग्रहालयात मुलांसाठी वेगळा विभाग निर्माण करण्यात आला. येथे मुलांना वस्तूंना हात लावायला आणि स्वतः प्रयोग करून पाहायला मुभा आहे.

तीन एकर जागेवर वस्तुसंग्रहालयाची प्रचंड इमारत दिमाखात उभी आहे. इमारतीच्या पुढच्या भागात मोठी जागा मोकळी सोडली आहे. तेथे पामची उंच झाडे लावली आहेत. या झाडांच्या पार्श्वभूमीवर वस्तूसंग्रहालयाची इमारत फारच खुलून दिसते. इमारत चौकोनी आकाराची असून तिच्यावर घुमट बसविला आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी सह्याद्री डोंगरात सापडणाऱ्या काळ्या दगडांचा वापर केलेला आहे. या इमारतीचे जवळून निरीक्षण केल्यास तिथे पूर्व आणि पश्चिम या दोन संस्कृतींचा मिलाफ झालेला आपल्या लक्षात येतो. जॉर्ज विटर (George Witter) या स्कॉटिश वास्तूविशारदाने या इमारतीची रचना केली. १९०९ साली घेतलेल्या एका स्पर्धेतून

(पृष्ठ क्र.३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेवीसावे/अंक ७/जानेवारी २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

‘दिशा’ प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | ॐ दत्तात्रेय नमः | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | मातृदेवो भव | कृष्णा पुरुषोत्तम धर्माधिकारी | ८ |
| ४) | गुरुवर्य नरहर कुरुंदकरांचा वारसा... | डॉ. आनंद कुलकर्णी | १० |
| ५) | ब्रह्मसूत्रे | डॉ. हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर | १५ |
| ६) | राष्ट्रभक्ती - एक अनिवार्य विषय | सौ. साधना जोशी | १९ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# ॐ दत्तात्रेय नमः
## (भाग २)

*ब्रह्मा, विष्णू व भगवान शिवाचे रूप मानल्या गेलेल्या दत्तात्रेय या देवतेविषयी माहिती देणारा लेख- संपादक*

दत्तात्रेयांच्या एका हातात शंख असतो. आपण भगवान विष्णुच्या मूर्तीचे निरिक्षण केले वा त्याचे धार्मिक साहित्यात आलेले वर्णन वाचले तर आपणास माहिती मिळते की, त्याला चार कर (हात) असून या चार हातांमध्ये प्रत्येकी गदा, चक्र, शंख आणि कमळाचे फुल आढळते. भगवान विष्णुच्या चक्राला सुदर्शन चक्र म्हणतात, शंखाला पांचजन्य तर गदेला 'कौमुदी' म्हणतात. दत्तात्रेयात भगवान विष्णुचाही अंश असल्यामुळे त्यांच्या एका हातात शंखही असतो. भगवान विष्णुच्या पांचजन्य शंखाविषयी आपणास विविध स्तोत्रांतून माहिती मिळते. हिंदू धर्मातील विविध धार्मिक कथांचे एक वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या स्तोत्रांमध्ये काहीवेळा या कथांमध्ये वा त्यातील व्यक्तीरेखांच्या नावांमध्ये थोडाफार फरक आढळतो. यामागचे कारण म्हणजे मूळ हिंदू धर्म साहित्यावर वेळोवेळी लिहिल्या गेलेल्या टीका व विश्लेषणे हे असावे असे म्हणणे वावगे ठरू नये. असो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, भगवान विष्णुच्या शंखाला 'पांचजन्य' असे म्हणतात. पांचजन्य शंखाविषयीची एक कथा पुढीलप्रमाणे आहे- शंखचूड नावाचा एक असूर असतो. तो तुलसीसोबत गंधर्व विवाह करतो. तुलसी पतिव्रता असल्यामुळे शंखचूडाला प्रचंड बळ प्राप्त होते. तद्नंतर तो आपल्या बळाने यातून जाऊन देवांवर हल्ला करतो. देव त्याचा पराभव करू शकत नाहीत. शेवटी भगवान शिव देवांच्या मदतीला धावून जातात. परंतु त्यांनादेखील शंखचूडाचा सहजासहजी पराभव करता येत नाही. असे लक्षात येते की, शंखचूडाची पत्नी तुलसी ही महान पतिव्रता असल्यामुळे शंखचूडाचा पराभव करणे कठीण जात आहे. त्यावेळी भगवान विष्णू शंखचूडाचे रूप घेऊन तुलसीचे पातिव्रत्य भंग करतात व शंखचूडाचा वध होतो. तुलसीला जेव्हा हे कळते तेव्हा ती भगवान विष्णुंना शाप देते की, ते पाषाण बनतील यावर भगवान विष्णू म्हणतात की, मी गंडकीच्या किनाऱ्यावरील आणि तुझ्या पतीचा शंखरूपाने माझ्या पूजेत समावेश करावा लागेल. भगवान विष्णुच्या शंखाबाबतची अजून एक कथा पुढीलप्रमाणे आहे (ही कथा महाभारतात आलेली आहे)- भगवान विष्णू पांचजन्य नामक दानवाचा चक्रवन पर्वतावर वध करतात आणि हा दानव ज्या शंखात राहात असतो तो शंख घेऊन जातात. अर्थात या दानवाच्या नावावरूनच भगवान विष्णुच्या शंखाचे पांचजन्य हे नाव पडले. आपणास पांचजन्य शंखाविषयी अजून एक माहिती मिळते व ती पुढीलप्रमाणे आहे- भगवान श्रीकृष्ण आपले गुरू सांदिपनी यांच्या आश्रमात (अभ्यासकांच्या मते सांदिपनींचा आश्रम मध्य प्रदेशातील सध्या उज्जैन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात होता) आपले ब्रह्मचर्य जीवन व्यतीत करून ज्ञानप्राप्ती करतात. तद्नंतर ते सांदिपनी ऋषींना आपली गुरुदक्षिणा मागण्यास सांगतात तेव्हा सांदिपनी आपल्या शिष्याला सांगतात की, त्यांच्या पुत्राला पांचजन्य वा शंखाचूड नावाच्या असुराने पळवून नेले आहे व तो असूर प्रभास सागराच्या तळाशी शंखात राहतो. त्यांच्या पुत्राला पांचजन्याच्या तावडीतून सोडवून आणणे हीच त्यांची गुरुदक्षिणा ठरेल. तेव्हा भगवान श्रीकृष्ण प्रभास सागराच्या तळाशी जातात व पांचजन्याचा वध करून सांदिपनी ऋषींच्या पुत्राला परत घेऊन येतात

व पांचजन्य शंख स्वतः:साठी ठेवतात. शंख हे वाद्य पूजेत वापरले जाते. आपण आजही पाहतो की, अनेक मंदिरांमध्ये आरती सुरू होण्यापूर्वी शंखनाद केला जातो. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, भगवान शिव व सूर्याच्या पुजेत शंखाचा वापर केला जात नाही. तसेच देवपूजा करताना अगोदर कलशाची पूजा केली जाते व त्यानंतर शंखाची पूजा केली जाते. पुराणांमधून आपणास अशी माहिती मिळते की, शंख वाजविल्यानंतरच मंदिराचे द्वार उघडावे, तसेच मंदिरात शंखध्वनी केल्यामुळे जी व्यक्ती शंखघोष करते ती पापमुक्त होते. प्राचीन काळात राजाची आज्ञा जनतेपर्यंत पोहोचवण्याअगोदरदेखील शंख वाजविला जात असे अशा स्वरूपाची माहिती आपणास मिळते.

प्राचीन काळात युद्धारंभी व युद्ध समाप्तीच्या वेळी शंखनाद केला जात असे अशा स्वरूपाची माहिती आपणास मिळते. महाभारतात विविध योद्यांकडे त्यांचे स्वतःचे शंख होते असे आपणास वाचावयास मिळते. महाभारतातील वेगवेगळे योद्धे त्यांच्याकडे असणाऱ्या शंखांची नावे पुढीलप्रमाणे आहेत- श्रीकृष्ण- पांचजन्य, अर्जून-देवदत्त, भीम (वृकोदर)-पौंड्र, युधिष्ठिर-अनंतविजय, नकुल- सुघोष, सहदेव- मणिपुष्पक.

शंखाला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे यात वाद नाही. मत्स्य पुराणानुसार चंद्राला प्रसन्न करून घेण्यासाठी शंखाचे दान करणे उचीत मानले गेले आहे. शंखाला आयुर्वेदात आणि भारतीय वैद्यकशास्त्रात फार महत्त्व आहे. शंखाची महती अथर्ववेदातदेखील वर्णिली गेली आहे. तर असा हा पवित्र शंख भगवान दत्तात्रेयाला देखील प्रिय आहे. त्यामुळे त्याच्या एका हातात शंख असतो. जणू शंख धारण करून गुरुदत्त मांगल्य व पावित्र्याचा संदेश आपल्या भक्तांना देतात. एवढेच नव्हे तर, एकप्रकारे अधर्म व पापाला शंखनाद करून त्याचा नाश करण्याची गर्जना करतात असे म्हणणे वावगे ठरू नये.

दत्तात्रेयांच्या हातात दिसणारे अजून एक आयुध म्हणजे चक्र होय. अर्थात हे भगवान विष्णुचे आयुध होय. भगवान विष्णुंच्या चक्राला सुदर्शन चक्र असे म्हणतात. सुदर्शन चक्राच्या सहाय्याने भगवान विष्णुने अनेक असूरांचा, तसेच दुष्ट प्रवृत्तींचा नाश केल्याचे आपण हिंदू धर्म साहित्यात वाचतो. लिंग पुराणातील कथेनुसार भगवान विष्णुला सुदर्शन चक्र भगवान शिवाने दिलेले असते. असूर देवांचा पराभव करतात. असूरांकडे संजीवनी असल्यामुळे त्यांचा पराभव करणे देवांना कठीण जाते (असुरांचे गुरू शुक्राचार्य संजीवनी विद्येच्या सहाय्याने असुरांना जिवंत करत असत असे आपण पुराणांमध्ये वाचतो). शेवटी भगवान विष्णू देवांच्या मदतीला धावून जातात व असूरांशी लढतात. हे युद्ध युगानुयुगे चालते, परंतु भगवान विष्णुलादेखील असूरांचा पूर्णपणे पराभव करणे कठीण जाते. त्यामुळे भगवान विष्णू मदतीसाठी भगवान शिवाकडे जातात. भगवान शिव ध्यानस्थ अवस्थेत असतात व त्यांचे ध्यानभंग केल्यावर ते क्रोधीत होतील म्हणून भगवान विष्णू भगवान शिवाला एक कमळाच्या फुलाच्या एक हजार पाकळ्या वाहून प्रसन्न करण्याचे ठरवितात. भगवान विष्णुच्या लक्षात येते की, एक पाकळी कमी पडत आहे तेव्हा भगवान विष्णू आपले एक नेत्र काढून ते भगवान शिवाला वाहतात (भगवान विष्णूला कमलनयनी म्हणजेच कमळासारखे नेत्र असलेला असेदेखील म्हणतात). भगवान शिव भगवान विष्णुच्या भक्तीने प्रसन्न होतात व त्यांना सुदर्शन चक्र देतात व त्या सुदर्शन चक्राने असुरांचा नाश करतात. याच सुदर्शन चक्राने भगवान विष्णुने समुद्रमंथनाच्यावेळी राहू नामक असूराचे धड शिरावेगळे करतात. तेव्हापासून राहूच्या धडाला केतू तर शिराला राहू म्हणतात. राहूचे धड शिरावेगळे करण्याचे कारण असे होते की, राहू समुद्रमंथनाच्यावेळी देवांचे रूप घेऊन त्यांच्यात सामील होतो व फसवून अमृत प्राशन करतो. भगवान विष्णुच्या राहूचे हे जल लक्षात येते.

परंतु त्याने अमृत प्राशन केले असल्यामुळे त्याला अमरत्व प्राप्त झालेले असते. त्यामुळे भगवान विष्णू आपल्या सुदर्शन चक्राच्या सहाय्याने त्याचे धड शिरापासून वेगळे करून त्याला शिक्षा देतात. सुदर्शन चक्राच्याच सहाय्याने भगवान विष्णुने सती मातेच्या शवाचे एकावन्न तुकडे केले होते. सती मातेच्या शरीराचे वेगवेगळे भाग ज्या ठिकाणी पडले तेथे शक्तीपीठे निर्माण झाली. या मागची पौराणिक कथा अशी की, भगवान शिवाचे सासरे व सती मातेचे पिता दक्ष प्रजापती एका महायज्ञाचे आयोजन केले होते. मात्र त्यांनी भगवान शिव व सती मातेला त्या यज्ञाचे आमंत्रण दिले नव्हते. सती माता भगवान शिवाकडे दक्षाच्या यज्ञात सामील होण्याचा हट्ट धरतात. भगवान शिव त्यांना समजावून सांगतात की, आमंत्रणाविना यज्ञात जाणे उचीत नाही. तेव्हा सती माता एकट्याच यज्ञात जातात तेथे दक्ष त्यांची व भगवान शिवाची निर्भर्त्सना करतात. त्यामुळे सती माता दु:खी होते व दक्षाच्या यज्ञात स्वत:ला भस्म करून टाकते. त्यावेळी भगवान शिव क्रोधीत होतात व आपल्या जटेतून वीरभद्र नामक भयानक असा रौद्र स्वरूपाचा योद्धा तयार करतात. हा वीरभद्र भगवान शिवाच्या गणांच्या मदतीने दक्षाचा यज्ञ उधळून लावतात व दक्षाचे शिर धडावेगळे करतात. भगवान शिव सती मातेच्या विरहाने दु:खी होतात व तिचे शव घेऊन सर्वत्र दु:खी मनाने फिरत राहतात. असेच दीर्घकाळ चालत राहिले तर सृष्टीचे संतुलन बिघडून जाईल अशी काळजी भगवान विष्णूसह सर्व देवांना वाटते. त्यामुळे भगवान विष्णू आपल्या सुदर्शन चक्राने सती मातेच्या शरीराचे तुकडे करून भगवान शिवाला विरहमुक्त करतात. भगवान विष्णुने समुद्रमंथनाच्यावेळी मंदार पर्वत कापण्यासाठी सुदर्शन चक्राचा वापर केल्याचे आपल्या वाचनात येते. भगवान श्रीकृष्णानेदेखील शिशूपालाचा वध करण्यासाठी याच शस्त्राचा वापर केला होता. तसेच महाभारतात जयद्रथ वधाच्या वेळी श्रीकृष्णाने सुदर्शन चक्राच्याच सहाय्याने सूर्य झाकोळून टाकण्याची माया केली होती कारण अर्जुनाने शपथ घेतलेली असते की, तो सूर्यास्तापूर्वी जयद्रथाचा वध करील. त्यामुळे अर्जुनाचा हा प्रण पूर्ण होण्यासाठी भगवान श्रीकृष्णाला ही माया करावी लागते. अशाप्रकारे सुदर्शन चक्राचा वापर भगवान विष्णू धर्मरक्षणासाठी तसेच पापवृत्तीचा नाश करण्यासाठी करतात. अभ्यासकांच्या मते वैदिक काळात सुदर्शन चक्र हे भगवान विष्णुचे एकप्रकारे काळचक्र होते परंतु कालांतराने त्याला भगवान विष्णुच्या दुष्ट प्रवृत्तींचा नाश करणारे प्रबळ आयुध मानण्यात येऊ लागले.

संत तुकारामांनी त्यांच्या अभंगात वर्णन केल्याप्रमाणे दत्तात्रेयांकडे गदादेखील असते. गदा हे आयुध भगवान विष्णूकडे असते. प्राचीनकाळी द्वंद्व युद्धात योद्धे गदेचा वापर करत. महाभारताचा विचार केला तर भीम तसेच दुर्योधन गदा युद्धात निपूण असतात. त्याचप्रमाणे जरासंध सुद्धा एक श्रेष्ठ गदाधर असतो असे आपणास वाचावयास मिळते. भगवान विष्णुच्या गदेचे नाव कौमोदकी असे असते. भगवान विष्णुची ही गदा त्यांच्या मत्स्य, कुर्म, वराह, नरसिंह तसेच श्रीकृष्ण या अवतारांत त्यांच्याकडे असते असे आपणास वाचावयास मिळते. महाभारतात श्रीकृष्णाला कौमोदकी गदा वरुणाने दिली होती अशी माहिती आपणास काही स्तोत्रांतून मिळते. कौमोदकी गदेची पूजा केल्यावर व्यक्तीस ज्ञान, शहाणपण, धाडस, धीटपणा तसेच सर्व प्रकारची सुबत्ता प्राप्त होते अशी धारणा आहे. भगवान विष्णू सुदर्शन चक्राच्या तेच कौमोदकी गदेचा अधर्माचा विनाश करण्यासाठी करतात. भगवान दत्तात्रेयांमध्ये देखील भगवान विष्णुचा अंश असल्याने त्यांच्याकडे सर्व पापी वृत्तीचा नाश करणारी गदा असते असे म्हणणे वावगे ठरू नये.

दत्तात्रेयांकडे काखेत एक झोळी आढळते. अर्थात, ही झोळी भिक्षा मागण्याच्या दृष्टीने उपयोगी पडते. हिंदू धर्मात संन्यासी, तसेच साधू भिक्षा मागून आपली तहान

---

इज्जत मागून मिळत नाही तर ती कमवावी लागते आणि ती कमवण्यासाठी
आयुष्यात काहीतरी वेगळं करावं लागतं.

व भूक भागवत असतात. हिंदू धर्मामध्ये संन्यासी व साधूंना भिक्षा देणे पुण्यकर्म मानले जाते. त्यामुळे आजही श्रद्धाळू व धार्मिक हिंदू आजही संन्याशांना, तसेच भुकेल्यांना भिक्षा तसेच अन्नदान करताना दिसतात. माहूर सारख्या पवित्र तीर्थक्षेत्रांना भेट दिल्यावर निदर्शनास येते की, तेथे साधूंना तसेच भक्तांना अनेक मठांमधून भोजन दिले जाते. भिक्षा मागणे हे पूर्वापारपासून जीवनातील मोह व मायेचा त्याग करून वैराग्याकडे झुकल्याची खूण मानली जाते. दत्तात्रेय देखील वैरागी होते अशा स्वरूपाचे त्यांच्याविषयीचे वर्णन आपणास वाचावयास मिळते. तसेच ते आश्रमात राहात असत अशा स्वरूपाची माहिती आपणास श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामीमहाराजकृत 'दत्तमाहात्म्य' या ग्रंथातून मिळते. त्यामुळे दत्तात्रेयांसारख्या वैराग्यवृत्ती असलेल्या देवतेकडे झोळी असणे साहजिकपणेच आले असे म्हणावे लागेल. दत्तभक्तीमध्ये शिधादान तसेच अन्नदानास फार महत्त्व आहे. अनेक दत्तमंदिरांमध्ये दत्तजयंती उत्सव साजरा करताना महाप्रसादाचे आयोजन करून भक्तांना व दर्शन घेणाऱ्या व्यक्तींना अन्नदान केले जाते. दत्तगुरुंना साधारणपणे पिवळे अन्न वा पदार्थ प्रिय असतात अशी मान्यता आहे. त्यामुळेच अनेकदा दत्तमंदिरांमध्ये भक्तगण पिवळी भिजवलेली हरभऱ्याची डाळ, गूळ आदी जिन्नस ठेवतात. त्याचप्रमाणे दत्तगुरुंना घेवड्याच्या शेंगांच्या भाजीचा नैवेद्य ठेवला जातो व त्यांना पिवळ्या पदार्थांची जसे पिवळी खिचडी आवड असते असे भक्तगण मानतात.

दत्तात्रेयांच्या चरणांमध्ये आपणास पादुका वा खडावा दिसतात. पादुका या साधारणपणे लाकडापासून बनविल्या जात किंबहुना आजही बनविल्या जातात. पादुका बनविण्यासाठी पूर्वापारपासून सागाचे, चंदनाचे व तत्सम असे काळे मजबूत लाकूड वापरले जात असे. पूर्वीच्या काळी कुलीन व राजकुळातील व्यक्ती हस्तीदंताच्या पादुका वापरत असत असे आपणास वाचावयास मिळते. परंतु पादुका बनविण्यासाठी मृत हत्तीचाच दात वा पाळलेल्या हत्तीचा दात त्याला इजा पोहोचू न देता वापरावा असा दंडक होता. भारतात सत्पुरुषांच्या व देवांच्या पादुकांचे पूजन करण्याची परंपरा आहे. ही परंपरा हिंदू, बौद्ध तसेच जैन धर्मात आढळते. बौद्ध धर्मिय बांधव बोधगयेला भगवान गौतम बुद्धाच्या पादुका असल्याचे मानतात व त्यांचे दर्शन घेतात. पायाच्या ठशांनादेखील पादुका म्हणण्याची प्रथा आहे. बिहारमध्ये गया जिल्ह्यात भगवान विष्णुचे विष्णुपद हे प्रसिद्ध मंदिर आहे. या मंदिरात भगवान विष्णुच्या चरणाचे (पायाच्या ठशाचे) म्हणजेच पादुकांचे पूजन होते. याविषयीची अशी कथा सांगितली जाते की, गयासूर नामक दैत्याने एकदा तपश्चर्या करून असा वर मागून घेतला की, त्याला जो कोणी पाहिल त्याला मोक्षप्राप्ती होऊ दे. मोक्षप्राप्तीसाठी खडतर तपश्चर्या करणे, नैतिकता व धर्माचे पालन करणे, तसेच देवाची मनोभावे भक्ती करणे अगत्याचे असते. परंतु गयासुराला प्राप्त वरदानामुळे पापी व्यक्तींनांही सहजासहजी मोक्षप्राप्ती होईल असे वाटून भगवान विष्णू गयासुराच्या मस्तकावर आपला पाय ठेवतात व त्याला जमिनीत गाडून टाकतात. ज्याठिकाणी भगवान विष्णू गयासुराला आपल्या पायाने जमीनीत गाडतात त्याजागी भगवान विष्णुच्या चरणाचा ठसा उमटतो व तेथेच विष्णूपद मंदिर असल्याची भक्तांची श्रद्धा आहे. गयासुर जमीनीत जातो परंतु तो भगवान विष्णुला अन्न मिळावे अशी याचना करतो त्यावेळी भगवान विष्णू त्याला वर देतात की, तुला प्रत्येक दिवशी कोणीतरी अन्न देईल व त्याला अन्न देणाऱ्याला स्वर्गप्राप्ती होईल. त्यानुसार आजही विष्णुपद मंदिरात गयासुराला अन्न देण्याची परंपरा आहे. भक्तगण म्हणतात की, ज्यादिवशी गयासुराला अन्न देणे बंद होईल त्यादिवशी तो पुन्हा एकदा जमिनीच्या बाहेर येईल. माधवाचार्य, चैतन्यप्रभू तसेच वल्लभाचार्यांसारख्या वैष्णवपंथीय महापुरुषांनी या ठिकाणाला भेट दिली होती असे भक्त मानतात.

आपण रामायणात असे वाचतो की, श्रीरामाला त्याची सावत्रमाता कैकेयीच्या हट्टावरून चौदा वर्षे वनवासावात जावे लागते. कैकेयीला तिचा पुत्र भरत याला सिंहासानावर बसवून अयोध्येचा राजा घोषीत करावयाचे असते. परंतु भरताला जेव्हा हे कळते तेव्हा तो आपल्या मातेवर क्रोधीत तर होतोच परंतु आपला ज्येष्ठबंधू श्रीराम याला वनवासातून परत आणावयास निघतो. श्रीराम व भरताची ही प्रसिद्ध भेट चित्रकूट पर्वतावर होते. श्रीरामाला (भगवान विष्णुचा सातवा अवतार. या अवतारात भगवान विष्णू रावणाचा वध करतात) भरताच्या आपल्यावरील प्रेमाने गहिवरून येते. परंतु प्रभू रामचंद्र भरताला सांगतात की, ते आपल्या पित्याचे (दशरथ राजाचे) कैकेयी मातेला दिलेले वचन पूर्ण करतील व चौदा वर्षांचा वनवास पूर्ण करूनच अयोध्येला परत येतील. तेव्हा भरत भगवान रामचंद्रांच्या पादुका आपल्या शिरावर घेऊन जातो व त्यांना अयोध्येच्या सिंहासनावर ठेवून श्रीरामाच्या नावाने ते वनवासातून परत येईपर्यंत राज्य करतो. प्रभू रामचंद्र जेव्हा वनवासातून परत येतात तेव्हा ते अयोध्येचा राजा बनून प्रजेची मनोभावे सेवा करतात.

आपण पाहतो की, औदुंबर, नरसोबाची वाडी (नृसिंह वाडी), गाणगापूर, तसेच गिरनार या दत्तगुरुंशी निगडित पवित्र ठिकाणी दत्तपादुकांची पूजा केली जाते. औदुंबर हे पवित्र ठिकाण पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील तासगाव या तालुक्यात आहे. असे म्हटले जाते की, इसवीसन १४२२ च्या आसपास नृसिंह सरस्वतींनी (हे भगवान दत्तात्रेयांचे कलीयुगातील दुसरे अवतार मानले जातात. यांचा जन्म विदर्भातील जिल्ह्यात झाला होता. भगवान दत्तात्रेयांचा कलियुगातील पहिला अवतार श्रीपाद वल्लभांचा होता असे मानले जाते. ते आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्ह्यातील पीठापूर तालुक्यातील होते) येथे चातुर्मास केला होता. येथे औदुंबराची (उंबराची) अनेक वृक्ष आहेत. हे ठिकाण कृष्णा नदीच्या काठी आहे. भक्तगण मानतात की, औदुंबरलाच श्री गुरूंनी जनार्दन स्वामींना व एकनाथ महाराजांना दर्शन दिले होते. जनार्दन स्वामी हे एकनाथ महाराजांचे गुरू होते व ते निस्सीम दत्तभक्त होते. असे म्हटले जाते की, जनार्दन स्वामींच्या प्रभावामुळेच एकनाथ महाराज दत्तभक्तीकडे वळले. श्री दत्तात्रेयांची 'त्रिगुणात्मक त्रैमुर्ती दत्त हा जाणा....' ही आरती देखील संत एकनाथांनीच लिहिली आहे. एकनाथांना आपले गुरू जनार्दन स्वामींविषयी नितांत आदर होता हे त्यांच्या पुढील ओळींवरून अधोरेखीत होते- 'वेद तो आम्हा जनार्दन, शास्त्र जनार्दन, पुराण जनार्दन, योग जनार्दन, तप जनार्दन, कर्म-धर्म सर्वकाही जनार्दन'. अशाप्रकारे गुरूला पवित्र वेद, पुराण, योग, तप तसेच आपले कर्म व धर्म यांचे उच्चस्थानी देणारा शिष्य सापडणे कठीण आहे. भारतीय व हिंदू परंपरेत गुरूला सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे व हेच तथ्य एकनाथ महाराजांनी आपल्या वरील ओळींवरून भक्तांसमोर आणले आहे. हिंदू संस्कृती एकमेव अशी असावी की जेथे गुरूला पूज्यनीय तर मानलेले आहेच, परंतु गुरूपौर्णिमेसारख्या पवित्र दिवशी गुरूची पूजादेखील केली जाते. असो. तर आपला मुळ मुद्दा असा होता की, जनार्दन स्वामी आणि संत एकनाथांना श्रीगुरूंनी औदुंबर येथे दर्शन दिले होते. औदुंबरला १८२६ च्या आसपास ब्रह्मानंदस्वामी गिरनारहून (हे ठिकाण गुजरातमधील सौराष्ट्र प्रांतात आहे. गिरनार ही पश्चिम भारतातील महान तपोभूमी मानली जाते. येथे दत्तात्रेय भगवान आजही तपश्चर्या करतात असे भक्तगण मानतात) आले होते. येथे त्यांचा मठ व समाधी आहे. ब्रह्मानंदस्वामींचे शिष्य सहजानंदस्वामी यांनी येथे जो घाट बांधलेला आहे तेथे दत्तपादुकांचे मंदिर आहे व येथे दत्तात्रेयांची पूजा पादुकांच्या स्वरूपात होते. औदुंबरला गुरूपौर्णिमा, दत्तजयंती, नृसिंहसरस्वतींचा जन्मोत्सव, महाशिवरात्र, गुरूद्वादशी आदी सण उत्साहाने साजरे केले जातात.

(पृष्ठ क्र.१४ वर)

# मातृदेवो भव

*प्रस्तुत लेखामध्ये आईचे महत्त्व विशद केले आहे - संपादक*

मातृदेवो भव। पितृदेवो भव।
आचार्यदेवो भव। अतिथीदेवो भव।

वरील सुवचन तैत्तीरियोपनिषदा मधील शिक्षावल्ली या अनुवाकातील आहे.

अर्थात उपनिषदामध्ये आईचे महत्त्व आहे. अनेकांनी आई विषयीचे प्रेम, ऋण व्यक्त केले आहे.

आई शब्दात फक्त दोन अक्षरे आहेत, पण यात समुद्राच्या पाण्याप्रमाणे अथांग असे सामर्थ्य आहे. आईच्या मते पुढे साऱ्या जगाचे प्रेम फिके पडते. सर्व दैवतात आई हे दैवत थोर आहे. आई म्हणजे देवाचे दुसरे रूप आहे. कारण देव प्रत्येकाच्या घरात जाऊ शकत नाही म्हणून देवाने आई प्रत्येकाच्या घरात पाठवली आहे! आई हे दुर्गेचे रूप, मायेचा सागर. थोर महाकाव्य रामायण यामध्ये स्वतः लक्ष्मण रामाचा संवाद सुरू असताना, लक्ष्मण म्हणतो -

अपि सुवर्णमयी लंका नमे लक्ष्मण रोचते।
जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।।

मला ही सोन्याची लंका चांगली वाटत नाही. माझी आई आणि मातृभूमी मला स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत. जगाला रडवणारा देव रामचंद्र प्रभू; पण तो वनात जात असताना आईला भेटायला आला तेव्हा कौशल्या माता रडत होती तेव्हा देवालासुद्धा रडणे आवरता आले नाही, हे आईचे प्रेम आहे.

आचार्य विनोबा भावे म्हणतात -

सर्व आरंभी तुमचाशी परमेश्वराची प्रतिमा आईच्याच रूपाने मुलाच्या समोर उभी राहते. उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे मातृपूजा.

कोणत्याही पवित्र मंगल कार्यात मातृकापूजन व पुण्याहवाचन हे दोन प्रयोग असतातच. त्यात मातृदेवतेचे पूजन शुभकार्यात केल्याने सर्व कार्य निर्विघ्नपणे संपन्न होते.

आई या शब्दापेक्षा जगात पवित्र शब्द नाही. म्हणतात ना :

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी

म्हणून लहानपणीच आईचे छत्र निघून गेलेले ज्ञानेश्वर महाराज श्रुतीला (वेद)आपली आई म्हणतात, कारण श्रुती एवढे ज्ञान आईशिवाय निस्वार्थपणे देण्यासाठी कोणाकडे नाही.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात:

अहिता पासुनी काढती।
हित देऊनी वाढविती।
नाही श्रुती परवती।
माउली जगा।।

आपल्या लेकराचे मुलाचे, हित ज्या गोष्टीत आहे ते हित जाणून आहे. त्या दृष्टीने त्या मुलाला प्रयत्न करायला लावते.

वेद, उपनिषद, अभंग गाथा इत्यादी मध्ये सुद्धा

श्रेष्ठ बनायचं असेल तर तुम्हाला असे काम करावं लागणार, ज्यांचा सामान्य लोक विचारपण करू शकणार नाहीत!

मातेला सर्वश्रेष्ठ दर्जा दिलेला आहे. सीताराम, लक्ष्मी नरसिंह, लक्ष्मीनारायण, रुक्मिणी पांडुरंग वरील नावांमध्ये आईलाच संतानी प्रथम दर्जा दिलेला आहे.

तुकाराम महाराजांनी आपल्या अनेक अभंगांमधून स्त्रियांना महत्त्वाचा दर्जा दिलेला व्यक्त होतो. वात्सल्य, प्रेम, ममता व्यक्त करताना तुकोबा म्हणतात -

घार हिंडते आकाशी।
चित्त तिचे पिलापाशी।

पिलाला भरवणारी माउलीच नाही का ती?

म्हणूनच तुकाराम महाराजांनी आई-वडिलाना धन्यता दिली आहे. ते म्हणतात -

धन्य माता पिता तयाचिया।

मासाहेब जिजाऊ नि प्रजेचे हित लक्षात घेऊन शिवाजीराजांना लहानपणीच जे संस्कार केले त्याचे फलित म्हणजे स्वराज्य होय. हिंदूपदपादशाही निर्माण करणे ही सामान्य गोष्ट नाही. ते शौर्य, ते धैर्य, ते संस्कार, जिजाऊंनी शिवरायांना दिले म्हणूनच खऱ्या अर्थाने शिवराय घडले. स्त्री विषयीचा आदर, सन्मान व मातेची श्रेष्ठता जिजाऊनी शिवरायांना शिकवली म्हणूनच शिवराय सुभेदाराच्या सुनेचा सन्मान करून म्हणतात -

अशीच माझी आई असती सुंदर रूपवती।
आम्हीही सुंदर झालो असतो वदले छत्रपती।

ही प्रेरणा, हा सन्मान, हे बाळकडू देण्याचे काम जिजाऊनी केले म्हणून शिवरायासारखे रत्न महाराष्ट्राला नव्हे जगाला मिळाले.

सध्याच्या धकाधकीच्या यांत्रिक युगामध्ये माणूस सर्व नातेसंबंध विसरून जात आहे. विशेष करून शिकलेल्या सवरलेल्या घरांमध्ये आई-वडिलांकडे दुर्लक्ष होत आहे. आपण आपली भारतीय परंपरा विसरत जात आहोत.

दारावर भेटीसाठी आलेल्या पांडुरंगाला देखील पुंडलिकाने आईवडिलांची सेवा करत असताना बाहेर थांबायला सांगितले व वीट दिली. पुंडलिक आईवडिलांची सेवा करत आहे आणि पांडुरंग मागची २८ युगे त्या विटेवर उभा आहे. हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दृष्टीने फार मोठे रूपक मातृ-पितृ सेवेसाठी उपयुक्त आहे.

आधुनिकतेच्या नावाखाली संस्कारांची जपवणूक महत्प्रयासाने करणे हे आजच्या पिढी समोरील मोठे आव्हान आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी भारतीय परंपरेतील सर्वोत्तम ग्रंथ यासाठी नक्कीच मार्गदर्शक आहेत. त्याचा सर्वांनी व्यासंग वाढवावा हाच यावरील उपाय आहे.

**- कृष्णा पुरुषोत्तम धर्माधिकारी**
प्राथमिक शिक्षक, पालम, जिल्हा परभणी

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# गुरुवर्य नरहर कुरुंदकरांचा वारसा..

*मराठी भाषेतील अत्यंत साक्षेपी लेखक समीक्षक व दार्शनिक प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या संदर्भात डॉ. आनंद कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

आपल्या समाजात सर्वांच्याच सर्व प्रकारच्या अस्मिता टोकदार होताना आणि विवेकवादी विचार आक्रसत जाताना आपण कोणाचं बोट धरायचं किंवा कोणाचा वारसा स्वीकारायचा असा मला प्रश्न पडतो. जात, धर्म, संप्रदाय, भाषा आणि प्रांत अशा मुद्यांभोवती आपल्या अविवेकी अस्मिता वेगाने घट्ट होत जातायत्. अशा काळात बुद्धीवादी विचार आणि तर्कनिष्ठ आकलन लुळे पांगळे होत जाणार हे ओघानेचं आलं. आपण बुद्धीजीवी समाज म्हणून जुन्या विचार आणि धारणांचं परिशीलन केलं पाहिजे. नव्या विचाराचा स्वीकार केला पाहिजे. नव्या संदर्भात एकूण जीवन व्यवहार आणि दृष्टीकोण याची चिकित्सा करायला शिकलं पाहिजे. आणि कुठल्याही विचारसरणीच्या साच्यात गोठून न जाता सतत विचारांच्या नव्या शक्यता शोधल्या पाहिजेत. हे मी लिहितोय तितकं सोपं आणि सहजसाध्य नाही. त्यासाठी विचारांच्या नकार आणि स्वीकाराची मोठी परंपरा असायला हवी. पाश्चात्त्यांकडे अशी विचार खंडण-मंडणाची आणि नव्या विचार शोधाची दीर्घ परंपरा आहे. फार मागे न जाता फ्रेडरिश नीत्शे पासून आपण सुरुवात केली तरी मार्क्स, फ्रॉईड, विटेगस्टाईन, हायडेगर, सार्त्र, बख्तीन, फुको, हाबरमास, देरीदा, बार्थ, क्रिस्टेवा, ल्योयता, अगम्बेन अशी असंख्य नावं घेता येतील. या आणि अशा विचारवंतांनी जुन्या परंपरांची चिरफाड केली, प्रचंड वैचारिक उलथापालथ घडवून आणली. परंपरेची आणि एकमेकांच्या विचारांची या लोकांनी जबरदस्त चिकित्सा केली. नीत्शे रुसोची चिकित्सा करतो, हाबरमास देरीदाची चिकित्सा करतो आणि फुको एकूण पाश्चात्त्य ज्ञानपरंपरेची चिकित्सा करतो. पण अशा प्रकारची चिकित्सा आपल्याकडे घडत नाही. आपण परंपरांना घट्ट धरून बसतो, नव्याला सतत नाकारतो. प्रस्थापित विचारांना उगाळत राहतो आणि वेगळ्या विचारांची मुस्कटदाबी करतो. आपण व्यक्तीपुजक आहोत, भावनांच्या लाटेवर वाहात जाणारे आहोत. त्यामुळे आपल्याला चिकित्सा नको असते. यांतून वैचारिक पळवाट म्हणून आपण छोटे कंपू तयार केले आहेत. मग अशा कंपूंनी आपापल्या वैचारिक सोयीच्या आणि हितसंबंध जपणाऱ्या चौकटी तयार केल्या. त्यात आपण फिट बसलो तर आपला उदो उदो आणि मिसफिट झालो तर मग आपण दखलपात्रही उरत नाही. जणू माणसांना स्वतंत्र विचार नसतोच. सतत तडजोडी करत प्रकाशात राहणं ही आपली एकंदर बौद्धिक समज असते आणि गरजही. 'माझ्या गळा तुझ्या गळा' असा प्रकार. वेगळ्या आणि



उंच स्वरात बोलणं अमान्य. अशा अचिकित्सक आणि अतार्किक वातावरणात आपण कोणाची वाट धरायची असा मला प्रश्न पडतो. मग मला उत्तर मिळतं– गुरुवर्य नरहर कुरुंदकरांची.

लहानपणी त्यांच्याविषयीचे स्तिमित करणारे किस्से मी ऐकले होते. परीक्षेची त्यांना चीड होती म्हणून एम. ए. ची परीक्षा झाल्यावर डोक्याचा गोटा करून त्यांनी परीक्षेच्या नावाने आंघोळ केली, विद्यार्थी असतानाच त्यांची पुस्तके बी. ए. आणि एम. ए. च्या अभ्यासक्रमाला होती, घर ते कॉलेज आणि परत घर असं चालत असतानाही ते पुस्तक वाचत असत असे अनेक किस्से ऐकून त्यांच्याविषयी विलक्षण आकर्षण वाटायचं. स्पष्टवक्ते असल्यामुळे अनेक प्रसंगात त्यांनी अनेक मान्यवरांची कशी भंबेरी उडवली होती याचेही अनेक किस्से ऐकले होते. प्राथमिक शिक्षक ते प्राचार्य पदापर्यंत त्यांचा प्रवासही असाच होता. अशी माणसं काय विचार सांगतात हे कळत नसलं की भोवतालची लोकं त्यांच्या भोवती रंजक किश्श्यांचा गोफ विणतात. कारण त्यांच्या विचित्र वागण्यातल्या गंमती–जमती आपलं मनोरंजन करतात. त्यातच आपल्याला रस असतो. त्यांचे विचार आपल्याला सोसत नाहीत, कारण त्यात बदल अपेक्षित असतात. मी दहा वर्षांचा असतानाच त्यांचं दुःखद निधन झालं. त्यामुळे त्यांना प्रत्यक्ष कधी मी भेटू शकलो नाही आणि ऐकूही शकलो नाही. बी. ए. करत असताना कुरुंदकरांचं ‘धार आणि काठ’ पहिल्यांदा वाचलं. ही माझी आणि त्यांची पुस्तकरुपाने झालेली पहिली भेट. अर्थात हे एक बरं झालं की, हे पुस्तक साहित्य समीक्षेशी संबंधीत होतं. यांतील लेखात कुरुंदकरांनी मराठीतील ह. ना. आपटे, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, श्री. ना. पेंडसे यांच्यासारख्या लेखकांच्या कादंबऱ्यांची विचक्षण चिकित्सा केली आहे. तेव्हा मला हे फार काही समजलं नाही. नंतर त्यातील समीक्षेची वेगळी दृष्टी उमगत राहिली. समीक्षक म्हणून कुरुंदकर मूल्यमापनाची कसोटी किती काटेकोर आणि तर्कशुद्धपणे साहित्यकृतींना लावायचे याचा हे पुस्तक म्हणजे वस्तुपाठ आहे. मराठी वाङ्मयावर क्ष–किरण टाकणाऱ्या अशोक शहाणे यांचं मराठी वाङ्मयाविषयीचं विवेचन म्हणजे मूल्यमापनाची चुकलेली कसोटी आहे असा निर्वाळा कुरुंदकर यात देतात. सार्त्र, काफ्का, कामू अशा युरोपियन लेखकांबरोबर मराठी लेखकांच्या कादंबऱ्यांची तुलना अनाठायी आणि चुकीची आहे असं त्यांचं निरीक्षण आहे. आणि याचं अतिशय तर्कशुद्ध कारणही ते देतात. त्यांच्यामते वाङ्मयाचा तौलनिक अभ्यास नसतो. तो आकलनाच्या सोयीसाठी असतो. तुलनाच करायची तर शरश्चंद्रांच्या कादंबऱ्यांबरोबर सयुक्तिक ठरेल असा त्यांचा निर्णय. विशेष म्हणजे हे मूळात चाळीस पानांचं ट्युटोरीयल होतं, पुढे त्याचं पुस्तक झालं. त्यांचं ’थेंब अत्तराचे’ हे पुस्तकही मला खूप आवडलं होतं. या पुस्तकात कुरुंदकरांनी विविध कविता संग्रहांना लिहिलेल्या प्रस्तावना आहेत आणि कवितांचं परीक्षण आहे. नंतर सावकाशीने त्यांची इतर पुस्तके वाचत गेलो– शिवरात्र, जागर, अभयारण्य, आकलन, अन्वय, रंगशाळा, रुपवेध, व्यासशिल्प, वाटा माझ्या तुझ्या, इ. खरं तर कुरुंदकरांच्या पुस्तकांमधे डावं–उजवं करणं खूप अवघड आणि अन्यायकारक आहे. पण मला व्यक्तीशः त्यांचं ‘अभयारण्य’ सर्वाधिक आवडतं. यात कुरुंदकर त्यांच्या विश्लेषण क्षमतेचं टोक गाठतात. जणू चिकित्सेची पोतडीच खोललीय आणि त्यातून विचारांचे मोती बाहेर पडत राहतात. स्वातंत्र्य या संकल्पनेवर यांतील सोळा लेख भाष्य करतात. एखाद्या संकल्पनेकडे संपूर्णपणे वेगळ्या दृष्टीकोणातून कसं बघावं याचं दिग्दर्शन कुरुंदकर यांत करतात. स्वातंत्र्याची त्यांची चिकित्सा इतकी मूलगामी आणि अपारंपारिक आहे की आपण झाक देरीदा या फ्रेंच तत्त्वज्ञाचं ‘लोकशाही’ संकल्पनेवरचं विवेचन वाचतोय असं मला वाटत राहतं. स्वातंत्र्य

म्हणजे काय याचं विवेचन करताना ते साधारणपणे भावरूप किंवा अभावरूप आहे असंच सांगितलं जातं. भावरूप म्हणजे स्वातंत्र्याचं अस्तित्व आणि अभावरूप म्हणजे बंधनाचा अभाव. पण कुरुंदकर वेगळं आणि अपारंपरिक विवेचन करतात. त्यांच्यामते स्वातंत्र्य हे मूळचे स्वाभाविक आणि नैसर्गिक; बंधने ही नंतरची अस्वाभाविक आणि अनैसर्गिक व म्हणून अयोग्य. स्वातंत्र्य संकल्पनेवर यापेक्षा मूलगामी विधान काय असू शकतं?

चर्चा आणि चिकित्सांच्यामुळे प्रीती आणि आदर कमी होत नसतो, तो डोळस होत असतो. आपले राष्ट्रनेते कोणी अजस्र शक्तीचे राक्षस नव्हते; किंवा ते नवीन सृष्टी घडविणारे परमेश्वर नव्हते. अफाट कर्तृत्व, न संपणारी जिद्द आणि विशाल बुद्धिमत्ता असणारी पण तुमच्या-माझ्याप्रमाणेच याच मातीतून जन्माला आलेली, गुणदोष मर्यादांनी युक्त असणारी उत्कट, जिवंत माणसे होती. त्यांच्या दगडी देवमूर्ती करून त्यांची खोटी पुजा करणे यात अर्थ नव्हता. कुरुंदकरांचा सर्व थोर व्यक्तींकडे बघण्याचा दृष्टीकोण असा अतिशय समकालीन, पूर्णपणे अपारंपरिक होता. त्यांच्या लेखी सर्व माणसेच. त्यामुळे देवत्व देण्यास आणि व्यक्तीपूजा करण्यास त्यांचा प्रखर विरोध होता. तर्कशुद्ध चिकित्सा हेचं आकलनाचं माध्यम आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता. आता असा दृष्टीकोण आणि अनवट चिकित्सा पद्धती विचारसरणीचे मठ स्थापन करून बसलेल्या विद्वानांना आणि अनुयायांना कशी झेपणार आणि पचनी पडणार? व्यास, वाल्मीकी, बुद्ध, शंकराचार्य आपल्या सारखी माणसेच आहेत. जे त्यांना जमतं ते आपल्यालाही जमलं पाहिजे असा त्यांचा प्रचंड बौद्धिक आत्मविश्वास बघून आपण बार्थ किंवा फुको वाचतोय याचा भास होतो. लोकहितवाद्यापासून मौलाना आझाद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस अशा अनेकांची कुरुंदकर चिकित्सा करतात. राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, राजकारण, कलेतील स्वातंत्र्य अशा असंख्य विषयांवर त्यांचं विश्लेषण वाचणं म्हणजे वास्तवाचं आरपार दर्शन. धार्मिक कट्टरतावाद मग तो हिंदूंचा असो की मुस्लीमांचा; तो कसा घातक आहे यांवर त्यांनी 'शिवरात्र' पुस्तकात परखड टीका केली आहे. हाती घेतलेल्या विश्लेषणात कशाचाही मुलाहिजा न ठेवता तर्क आणि बुद्धीवादाच्या कसोटीवर चकित करणारे निष्कर्ष कुरुंदकर मांडतात. आपण असा विचार का केला नाही याचं आपल्याला आश्चर्य वाटतं, असा संपूर्णपणे वेगळा विचार करता येतो याचा विस्मय वाटतो आणि नव्या शक्यता गवसल्याने आनंद होतो. मला त्यांची लेखनशैली प्रचंड भावते. भाषेच्या वापरात एखाद्या पंडिताला शोभेल अशी शब्दरचना कुरुंदकर करतात. ती बोजड नाही पण विचाराला प्रवृत्त करणारी आहे. त्यात कोरडेपणा आणि निरर्थक शब्द फुलोरा नसतो. चपखल उदाहरणे देऊन प्रतिपाद्य विषय वाचकांपर्यंत पोचवण्यात ते यशस्वी होतात. त्यांचा आशय मात्र तर्ककठोर असतो, त्यात भावनेला थारा नसतो. इथे वाचकांची परीक्षा असते. कशाला तरी कवटाळून बसायची आपल्याला पारंपरिक सवय आहे. कुरुंदकरांचा आशय अशा मनोधारणेला उभा छेद देतो, आपल्यासाठी नव्या विचारांचं विश्व खुलं करतो. यांत वाचकांची पुन्हा अडचण अशी की, कुरुंदकर कोणत्याही विचारधारेचं समर्थन करत नाहीत. ते स्वत:ला कशाशी बांधून घेत नसल्याने आपण कशाच्या आधाराने त्यांच्याबरोबर विचार प्रवाहात जावं हे उमगत नाही. कुरुंदकर अथांग विचार प्रवाहात खूप पुढे जाऊन आपल्याला खूणावत राहतात. आपल्याला त्यांच्यासोबत जायचं तर दमछाक होते. ते नास्तिक होते आणि पक्के विज्ञानवादी. साहजिकच त्यांची कशावरही आणि कोणावरही देवभोळी श्रद्धा नव्हती, पण संविधानावर माझी श्रद्धा आहे असं ते सांगत. या सोबतच मानवता आणि मानवतेच्या उज्ज्वल भवितव्यावरही त्यांची श्रद्धा होती. विशेष म्हणजे ते

पोथीनिष्ठ विद्वान नव्हते. याचा अर्थ हा की, ज्ञानाच्या बाबतीत त्यांचा एखादा आवडता वैचारिक आखाडा नव्हता आणि ते पारंपरिक तात्विक धारणांना थेट आव्हान द्यायचे. मला व्यक्तीश: त्यांचा हा विशेष खूप आवडतो. धर्मातील श्रद्धेचं सोडा, ज्ञानक्षेत्रातील साचेबंद श्रद्धेलाही त्यांचा स्पष्ट विरोध होता आणि असा विरोध मुखर करायला कुरुंदकर कधीच कचरले नाहीत.

मला कुरुंदकरांविषयी अत्यंत जिव्हाळा आहे तो त्यांच्या अफाट व्यासंगामुळे, चिकित्सक वृत्तीमुळे आणि निर्भीड मतप्रदर्शनामुळे. अगदी प्राथमिक पातळीवरचं बोलायचं तर कुरुंदकर मराठवाड्यातील आहेत ही माझ्यासाठी प्रादेशिक जवळीक आहे. मराठवाड्याचा वैचारिक अनुशेष कुरुंदकरांनी अवघ्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात भरून काढला म्हणून ही जवळीक. पण त्यांचं वेगळेपण सुरू होतं ते त्यांनी अभ्यासपूर्वक प्रादेशिक सीमा ओलांडल्यानंतर. साहित्य, कला, तत्त्वज्ञान, शिक्षण, इतिहास, संगीत, राजकारण अशा अनेक गोष्टींचा त्यांचा थक्क करणारा अभ्यास आहे. बरं, हा नुसता पुस्तकी व्यासंग नसतो, तर त्यात चिकित्सक वृत्ती असते. कुरुंदकर खूप मोठ्या माणसांची चिकित्सा करायला घाबरत नाहीत. माणसांच्या आणि विचारांच्या मर्यादा दाखवत ते आपल्याला सतत काळाबरोबर पुढे नेत राहतात. आकलनाच्या नव्या वाटा दाखवत राहतात. कुरुंदकर भरताच्या नाट्यशास्त्रावर लिहितात, शंकराचार्यांचा विवर्तवाद नाकारतात, काँग्रेस पक्ष हा हिंदुंचा पक्ष आहे असं मत मांडतात, हिंदुंना सेक्युलर व्हायला सांगतात, गांधींची आणि फाळणीची चिकित्सा करतात, स्वातंत्र्य संकल्पनेचं दीर्घ विश्लेषण करतात, मार्क्सवादाच्या मर्यादा उघड करतात. अशी चिकित्सा करताना ते कोणाचेही नसतात. आपण कोणत्याही विचारसरणीचा आजन्म वाहक व्हायचं नाही याची ते पुरेपुर काळजी घेतात. त्यांची बांधिलकी तर्क, विवेक आणि हाती घेतलेल्या विषयाच्या चिकित्सेशी असते. ते सर्वांची चिकित्सा करत दोष दाखवून देतात. अशा चिकित्सेत कोणी दुखावला तर त्याची त्यांना फिकिर नसते. कारण त्यांना पद, प्रतिष्ठा, पैसा यांपैकी काहीही नको असतं. चिकित्सक बुद्धी गुंडाळून ठेवून ते कोणाच्याही वळचणीला जात नाहीत. असा निर्भीड चिकित्सा करणारा माणूस सगळ्यांची गैरसोय करतो. मग हिंदुत्ववाद्यांना ते नको असतात, मार्क्सवादी आणि पुरोगाम्यांना ते अडचणीचे ठरतात.

कुरुंदकर समजून घ्यायचं तर आधी त्यांना situate करायला लागतं आणि काही केल्या कुरुंदकरांचे लिखाण असं situate होतं नाही. मग एकतर त्यांच्या मोठेपणाची आरती गाणं, त्यांच्या विक्षिप्तपणाचे किस्से सांगणं, नाही तर वरवरचं वाचून भाष्य करणं एवढंच हाती उरतं. कुरुंदकर कोणत्याही ideology अडकत नाहीत. ते शोधक आहेत आणि चिकित्सकही. स्वत:च्या सोयीच्या आणि लोकानुनयी भूमिका ते घेतं नाहीत. वाचकांच्या मनातील धारणांना सतत धक्के देऊन विचारप्रवृत्त करणं हे त्यांचं कामं आहे. पण म्हणून ते अनावश्यक मूर्तीभंजनही करत नाहीत. ते वाचकांना आपल्यासोबत घेतात, सत्यान्वेषण करायला लावतात आणि त्यांची मतं स्वीकारायची की नाही याचं पूर्ण स्वातंत्र्य वाचकाला देतात. त्यांची चिकित्सापद्धती फार अनवट आहे, ती तुम्हाला त्यांच्या मतांशी लगट करू देत नाही, पण सुरक्षित अंतरावरून न्याहाळायला मदत करते. एखादा आपल्या मनातील रुजलेला पण अव्यक्त मुद्दा त्यांच्या लिखाणात येतो. त्याचा आनंद घेईपर्यंत दुसरा त्याला काटशह देणारा फटकारा येतो आणि तुम्ही भानावर येता. स्वीकार व नकार तुमचे तुम्ही ठरवायचे! पण तोपर्यंत कुरुंदकरांनी तुम्हाला अस्वस्थ केलेलं असतं हे नक्की. कुरुंदकर तुम्हाला मतांवर आरूढ होऊ देत नाहीत, मतांची चिकित्सा करायला लावतात. हे अवघड असतं;

---

प्रॅक्टिस अशी करा जसं काय तुम्ही कधीच जिंकलाच नाहीत आणि परफॉर्मन्स असा द्या की जसं काही तुम्ही कधी हरलाच नाही.

स्वत:चं परीक्षण करण्यासारखं असतं. बाळबोधात सगळ्यांचा निर्धोक स्वीकार करायची आपल्याला सवय असते. अशी परंपरांची चिकित्सा करणं आपल्यासाठी आव्हान असतं. हा गुरुवर्य कुरुंदकरांचा वारसा आहे. आपण तो पुढे न्यायचा यथाशक्ती प्रयत्न केला पाहिजे. कारण बुद्धिमत्ता आणि विकास व्यक्तीगत असतो तेव्हा तो स्वत:पुरताच असतो. तो जेव्हा सामूहिक होतो तेव्हा तो शहाणा होतो. माझ्यालेखी शहाणपण सामूहिक प्रगल्भतेत असतं आणि कुरुंदकर असं चिकित्सक शहाणपण यावं यासाठी आयुष्यभर झटत राहिले.

कुरुंदकरांचं समकालीनत्व शोधायचं तर काही गोष्टी लगेच लक्षात येतात. आज सगळीकडे आंतरशाखीय अभ्यासाचा बोलबाला आहे. कुरुंदकरांनी असा अभ्यास सत्तर-ऐंशीच्या दशकात नुसता अनुसरला नाही तर त्याला उत्तुंग पातळीवर नेऊन ठेवला. दुसरं म्हणजे, कुरुंदकर विचारांमधे अडकून पडत नाहीत. जुन्याची चिकित्सा आणि नव्याचा स्वीकार करताना नवही जुनंच होत जाणार याची जाणीव सतत त्यांच्या लिखाणात असते. मला कुरुंदकरांमधे डॉ. सॅम्युअल जॉन्सन आणि रोलाँ बार्थ एकत्र आलेले दिसतात. जणू या दोघांची मराठी आवृत्ती म्हणजे कुरुंदकर. जॉन्सनची व्यासंग आणि चिंतनातून आलेली अव्वल दर्जाची समीक्षा आणि रोलाँ बार्थची सतत स्वत:ला नाकारणारी, नवं शोधणारी कल्पक चिकित्सा ही दोन्हीही कुरुंदकरांमधे आहेत.

चला, आपण कुरुंदकरांचा वारसा चालवायचा प्रयत्न करू या!

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

(पृष्ठ क्र. ७ वरून - **ॐ दत्तात्रेय नमः**)

नृसिंहवाडी (या तीर्थक्षेत्राला नरसिंहवाडी वा सामान्य लोक नरसोबाची वाडी असेदेखील म्हणतात) हे पवित्र ठिकाण पश्चिम महाराष्ट्रातील संपन्न अशा कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ या तालुक्यात कृष्णा व पंचगंगा या नद्यांच्या संगमावर आहे. येथे दत्तात्रेयांचे प्रथमावतार श्रीपाद वल्लभदेखील येऊन गेले होते असे म्हणतात. श्रीपाद वल्लभांचे उत्तरावतार वा भगवान दत्तात्रेयांचे दुसरे अवतार नृसिंह सरस्वती यांचे येथे बारा वर्षे औदुंबर वृक्षाखाली वास्तव्य होते व ते येथे तपश्चर्या करत होते. शेवटी त्यांना गाणगापूरला जाऊन तेथे ध्यानधारणा करावी असे वाटू लागले. त्यांच्या नृसिंहवाडीतील भक्तगणांना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांनी नृसिंह सरस्वतींना हे ठिकाण न सोडण्याची विनंती केली. परंतु ऋषीतुल्य वैराग्यांच्या मनात एखादी गोष्ट आल्यावर ते ती पूर्ण करतातच. त्यामुळे त्यांनी एकदा गाणगापूरला जायचे ठरविल्यावर ते तेथे जाणारच यात काही वाद नव्हता. त्यामुळे नृसिंह सरस्वती गाणगापुरी जाणारच होते परंतु भक्तांचा हिरमोड होऊ नये म्हणून त्यांनी तेथे आपल्या पादुकांची स्थापना केली व भक्तांना सांगितले की, त्यांनी श्रद्धा भावनेने पादुकांचे पूजन केल्यावर त्यांच्या मनीच्या इच्छा पूर्ण होतील. नृसिंहवाडीलादेखील दत्तजयंती व गुरूपौर्णिमा महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरे होतात व नृसिंहवाडी हे दत्तभक्तांसाठीचे फार पवित्र व लोकप्रिय तीर्थस्थळ आहे. (क्रमशः)

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

•••

एक वेळेस दहा कामं करण्यापेक्षा दहा वेळेस एकच काम करा; यश नक्कीच तुमच्या हातात येईल.

# ब्रह्मसूत्रे

*या लेखात आपण वेदान्तातील मूलभूत अशा 'ब्रह्मसूत्रे' या ग्रंथाचा परिचय करून घेणार आहोत. सध्याच्या जगात आणि शिक्षण क्षेत्रात बऱ्याच जणांचे लक्ष वेदान्ताकडे आकर्षिले गेले आहे, परंतु सर्वसामान्य माणसांना समजेल अशा रीतीने त्याची मांडणी केली गेली तरच त्याची माहिती व प्रसार होईल. तसा प्रारंभ या लेखाने व्हावा अशा इच्छेने ही प्रस्तुती केली आहे. विषयच जरा कठीण असल्यामुळे काही ठिकाणी शब्दरचना व तात्त्विक मुद्दे जरी कठीण वाटले तरी त्यावर नंतर साध्यासुध्या भाषेत खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे - संपादक*

**प्रास्ताविक**

प्राचीन काळात, आश्रमांतून शिकवताना प्रथम अगदी थोडक्यात पण अर्थगर्भ भाषा असलेल्या अशा सूत्रबद्ध पद्धतीने विषय मांडून नंतर त्याचे विवरण केले जाई. सूत्रे लक्षात ठेवायला सोपी जात व नंतर त्यावर चिंतन, चर्चा होत असे. ब्रह्मसूत्रांमध्ये परब्रह्माचे स्वरूप आणि गुणविशेष, सूत्रबद्ध पद्धतीने वर्णन केले आहेत. त्यात वेदान्तातील (उपनिषदांतील) तत्त्वज्ञानच सांगितले आहे. त्यातील काही, परस्पर विरोधांचा समन्वयही केला आहे. उपनिषदांना श्रुतीची पदवी आहे (श्रुती म्हणजे ऐकून तयार झालेले म्हणजेच वैदिक वाङ्मय, त्यापेक्षा वेगळे म्हणजे लिहिलेले शास्त्र वगैरे ग्रंथ हे स्मृती या व्याख्येत मोडतात). उपनिषदांच्या या श्रुती पदवी असण्याने, शब्दप्रामाण्याच्या युगात सर्व उपनिषद्वाक्यांचा समन्वय करून त्यातून एकच एक अर्थ काढणे आवश्यकच होते. ही सूत्रे बादरायण ऋषींनी तयार केली असे मानतात व त्यांनाच कृष्णद्वैपायन अथवा द्वैपायन वेदव्यास म्हणून कित्येक पंडित निर्दिष्ट करतात परंतु ऐतिहासिकदृष्ट्या बादरायण व्यास व कृष्णद्वैपायन वेदव्यास या व्यक्ती भिन्न आहेत, असे मानावे लागते. एकूण काय तर विविध उपनिषद वचनांची मीमांसा करून त्यांची एकवाक्यता दाखवून देण्यासाठी व उपनिषदांचा सारांश साांगण्यासाठी ही जी सूत्रे रचली गेली त्यांस ब्रह्मसूत्रे म्हणतात. या सूत्रांचा काळ ख्रिस्तपूर्व १०० ते २०० यातला असावा.

ब्रह्मसूत्रांना शारीरकसूत्रे असेही म्हटले जाते. कारण त्यात विश्व आणि परब्रह्म यांचे नाते शरीर आणि आत्मा अशा स्वरूपाचे आहे असे सांगितले आहे.

त्यांना उत्तर-मीमांसा सूत्रे असेही म्हटले जाते कारण त्यांत वेदांच्या अंतिम भागांचा विचार केलेला आहे. आणि भिक्षू-सूत्रे असेही म्हटले जाते कारण ती भिक्षू किंवा संन्याशांनी प्रारंभीच्या काळात अभ्यास करावा अशी शिफारस केलेली आहे. या सर्व नावांवरूनही त्यांच्या अंतरंगाची थोडीशी कल्पना येते. रामानुजाचार्यांच्या मतानुसार ही सूत्रे ५४५ आहेत व त्यांत ४ अध्याय आणि १६ पाद आहेत. संख्येबद्दल इतरही काही मते आहेत.

वेदान्तात (वेदवाङ्मयाचा निर्णायक व सर्व सार असलेल्या भागात),- उपनिषदे येतात, त्यांचाच विचार प्रामुख्याने येतो. परंतु त्यात प्रस्थानत्रयी असे म्हटलेल्या, तत्त्वज्ञान मांडणाऱ्या तीन निरनिराळ्या विचारधारांचा विचार येतो - त्या म्हणजे उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व भगवद्गीता, या तिन्हींतून मांडलेले तत्त्वज्ञान हा वेदान्ताचा भाग आहे. प्रस्थानत्रयीवर (त्यात येणाऱ्या सर्व ग्रंथांवर व लिखाणावर) बऱ्याच संत व विद्वानांनी लिहिले आहे,

जगाला आवडेल ते कराल तर एक product म्हणून राहाल आणि स्वतःला आवडेल ते कराल तर एक brand म्हणून जगाल!

भाष्ये केली आहेत. गुरुदेव रानडे यांचे उपनिषद रहस्य, वेदान्त व ध्यानोपकारिणी गीता हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

उपनिषदे व भगवद्‌गीता यांच्यावरील गुरुदेव रानडे यांच्या ग्रंथांच्या संदर्भात व काही स्वतंत्रपणे अन्यत्र लिखाण (ग्रंथ - गुरुदेव रानडे तत्त्वज्ञान व व्यक्तिमत्त्व, ध्यानोपकारिणी गीता, गीतेतील जीवनविषयक तत्त्वज्ञान (इंग्रजी), गीतेतील सार्वकालिक तत्त्वज्ञान व मानसशास्त्र वगैरे ग्रंथ व अनेक लेख) मी पूर्वी केले आहे, म्हणून या लेखात फक्त ब्रह्मसूत्रांवरच परिचयात्मक लिखाण केले जाणार आहे. सारांशरूपाने सूत्रांचे अंतरंग आता पाहू या.

**अध्याय पहिला - 'समन्वयाध्याय'**

यात १३४ सूत्रे व ३९ अधिकरणे (विषयवार केलेले भाग) आहेत. याला 'समन्वयाध्याय' असे म्हटले जाते, कारण यात निरनिराळ्या उपनिषदांतून सांगितलेल्या तत्त्वांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' या सूत्राने प्रारंभ होतो - म्हणजे, संसाराच्या उद्वेगजनक अनुभवांनी वैतागलेल्याने, मुक्ती मिळवण्यासाठी, ब्रह्म जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. कारण ब्रह्म जाणल्याने वा अनुभवल्याने मोक्ष वा परा गती प्राप्त होत असल्याने ते नीट समजून घेतले पाहिजे.

निरनिराळ्या उपनिषदांतून हे स्पष्ट होते की, ब्रह्मापासूनच हे विश्व निर्माण होते, त्यातच निवास करीत असते व त्यातच विलयही पावते. ब्रह्म जाणणे हे श्रुती किंवा उपनिषदे यांच्याच साहाय्याने शक्य आहे.

ब्रह्म हेच जगाच्या उत्पत्तीचे एकमेव कारण आहे, मात्र सांख्य तत्त्वज्ञानी मानतात तसे प्रकृती हे उत्पत्तीचे कारण असू शकत नाही, कारण अचेतन किंवा निर्जीव प्रकृती, असे सर्वांग परिपूर्ण विश्व घडवू शकत नाही.

ब्रह्म हे आनंदमय आहे. ते सर्वव्यापी (सर्व जीवात्मे त्यातच आहेत) व ते सर्वांच्या पलीकडचेही, समजण्यास अशक्य असे आहे. प्रकाश, सूर्य, आपले डोळे या सर्वात ते आहे. त्याला आकाश, प्राण, भूमी किंवा अक्षर, अंगुष्ठमात्र, आत्मा असेही म्हटले जाते. अग्नीपासून ठिणग्या तसे जीवात्मे ब्रह्मापासूनच उत्पन्न होतात. जीव वेगळे भासले तरी मुक्तीनंतर त्यातच मिसळतात.

शेवटी म्हटले आहे की, ब्रह्म हे उपादान कारण (मटेरियल कॉज) आणि निमित्तकारण (एफिशंट कॉज) हे दोन्हीही आहे. नित्य तृप्त असे ब्रह्म, प्रयोजनावाचून लीलेने सृष्टी निर्माण करते, ब्रह्माचा मायारूप शक्तींनी जगद्रूप परिणाम होतो तो खरा नाही, मिथ्या आहे.

**अध्याय दुसरा - 'अविरोधाध्याय'**

या अध्यायाला 'अविरोधाध्याय' असे नाव दिले आहे. कारण हा अध्याय वेदान्तातील तत्त्वज्ञानाला विरोध वा खोटे ठरविणाऱ्या मतांचे खंडन करतो. त्यात १५७ सूत्रे असून, ती ४७ अधिकरणांत विभागली आहेत. वेदान्त हा काही स्मृतीच्या विरोधात नाही जसे भगवदगीता वा अपस्तंभसूत्रे यात मांडले गेले आहे व तर्काच्याही विरोधात नाही. मात्र त्याला विरोध करणाऱ्या सांख्यांच्या तत्त्वज्ञानातच चुका आहेत. उपनिषदांतील विश्व निर्मितीच्या संदर्भात मांडलेल्या निरनिराळ्या मतांमध्ये खरेतर काहीच विरोधाभास नाही, हा या अध्यायातील विवेचनात मांडलेला मुख्य भाग आहे. बादरायणांच्या काळात, वेदान्ताशिवाय इतर मतांमध्ये/प्रणालींमध्ये सांख्य हीच मुख्य प्रणाली होती. त्यामुळे तिच्याकडे या अध्यायात जास्त लक्ष दिले आहे. (सांख्य म्हणजे कपिलमुनींनी स्थापन केलेली पद्धती - प्रणाली. या सांख्यशास्त्रात जीव आणि ब्रह्म यांची फारकत केली आहे. उपनिषदांच्या मानाने त्यांचे तत्त्वज्ञान दुय्यम मानले

जाते, मात्र मानव सत्त्व-रज-तम या त्रिगुणांनी युक्त आहे, हे सांख्यांचे तत्त्वज्ञान फार महत्त्वाचे मानले जाते).

एक मुख्य मुद्दा या अध्यायात जो चर्चिला गेला आहे, तो आहे कारण आणि कार्य वा परिणाम. सांख्यमतातील 'सत्-कार्य-वाद' - यात सांगितले आहे की, कार्य वा परिणाम हा कारणात अगोदरच अस्तित्वात असतो (सत म्हणजे असलेला). निर्मितीच्या प्रकियेत तो व्यक्त होतो इतकेच, नव्याने निर्मिला जात नाही. कारण जे खरोखर असते (सत्) ते कधीच नसलेल्यातून (असत् मधून) निर्माण होऊ शकत नाही. दुसऱ्या बाजूला वैशेशिक परंपरेने, 'असत-कार्य-वाद' स्वीकारला आहे ज्यामध्ये पूर्वी अस्तित्वात नसलेल्यातून नव्याने निर्मिती होते असे मांडले आहे. (प्राचीन भारतात न्याय, वैशेशिक, सांख्य, योग, मीमांसा व वेदान्त अशा सहा आस्तिक मताच्या (म्हणजे वेदप्रामाण्य मानणाऱ्या) व नास्तिक (वेदप्रामाण्य न मानणाऱ्या) मताच्या जैन, बौद्ध, चार्वाक, अशा तीन तत्त्वज्ञानाच्या शाखा किंवा विचारधारा होत्या).

अगोदर म्हटल्याप्रमाणे कार्य किंवा परिणाम, उपादान कारणामुळे (जसे माती व तिच्यापासून घट) अस्तित्वात असतेच. आणि नंतर म्हटलेल्यात निमित्त-कारण हे कायमचे असतेच. बादरायणांनी ही मते काही प्रमाणात स्वीकारली आहेत आणि ते म्हणतात, उपनिषदांच्या आधारे हे स्पष्ट होते की, ब्रह्म हे 'अभिन्न-निमित्त-उपादान-कारण' आहे, ते, या विश्वाच्या निर्मितीसाठी दोन्ही प्रकारचे म्हणजे उपादान व निमित्त कारण आहे. त्यामुळे हे विश्व ब्रह्मापासून वेगळे नाही (नॉन डिफरंट). एक हरकतीचा मुद्दा असा मांडलेला आहे की, या विश्वात अचेतन वस्तू आहेत व चेतन अशा ब्रह्मापासून त्या निर्माण होऊ शकत नाहीत. हे मत मान्य होऊ शकत नाही कारण, सर्व बाबतीत अंतिम मत असे मानलेल्या श्रुतींनीच असे सांगितले आहे की, अशा गोष्टी या सामान्य मानवी बुद्धीने समजण्यासारख्या नाहीत.

या विश्वाच्या निर्मितीमध्ये ब्रह्माचा कसलाही स्वार्थी हेतू मुळीच नाही कारण ब्रह्म हे आत्म-संतुष्टच आहे. या विश्व निर्मितीत कसलाही पक्षपातीपणा वा अपुरेपणा नाही, कारण जीवांनी केलेल्या कर्माप्रमाणे त्यांना परतफेड/फळ वा शिक्षा अशी न्यायव्यवस्था आहे. या विश्वनिर्मितीचा हेतूच मुळी जीवांनी, ब्रह्माशी एकरूपता मिळवून शाश्वत आनंद/सुखाची प्राप्ती करून घ्यावी हा आहे.

या अध्यायात, वरील विवेचनाशिवाय, वैशेशिक, बौद्ध, जैन, पाशुपत आणि पंचरात्र भागवत या सर्व मतांचाही पूर्ण विश्लेषणासहित विचार केला आहे आणि त्या मतांचे खंडण केले आहे.

वरील सर्व जरा कठीण वाटणाऱ्या शब्दजंजाळाचा थोडक्यात अर्थ म्हणजे हे विश्व ब्रह्मातूनच निर्माण झाले आहे व त्यातील सर्वांनी योग्य ती कर्मे करून परत ब्रह्माशी एकरूप होण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, अयोग्य व ब्रह्मापासून दुरावणारी कर्मे टाळायला हवीत.

**अध्याय तिसरा - 'साधनाध्याय'**

हा अध्याय सर्वात मोठा असून, यात ६७ अधिकरणात विभागलेली १८६ सूत्रे आहेत. जरी 'साधनाध्याय' असे नाव दिले असले तरी बरेच वेगवेगळे विषय यात आले आहेत. त्यात जीवाचे दुसऱ्या शरीरात स्थलांतरण वा परलोकात गमन, जीवाचे स्वप्ने निर्मितीकरण, उपासना मार्ग, ज्ञानोत्पत्तीची अंतरंग (शमदमादी) व बदहरंग (यज्ञादी) साधने, जीवाने केलेल्या कर्माबद्दल ईश्वराच्या इच्छेप्रमाणे आलेल्या पारितोषिक वा शिक्षा अशा प्रकारचे अनुभव घेणे, उपनिषदांमध्ये उल्लेख केलेल्या अनेक विद्या व ध्यानधारणा आणि या सर्वांवर तपशीलवार विवेचन आणि त्यावरील खुलासे, एखाद्या विद्येवर निरनिराळ्या उपनिषदांनी मांडलेल्या निरनिराळ्या बाबींचे सुसूत्रीकरण, कर्म व

धार्मिक कर्मकांडातील - विधींमुळे होणारे संस्कार, त्याबद्दलचे काही खुलासे, तसेच, ब्रह्मचर्य ते संन्यास अशा जीवनातील निरनिराळ्या आश्रमांसाठी विहित केलेली कर्तव्ये, काही अयोग्य कामांसाठी विहित केलेली प्रायश्चित्ते, असे अनेक विषय व त्यांवर विवेचन या अध्यायात केले आहे. श्रवणादी साधन फुकट जात नाही हेही सांगितले आहे. ब्रह्मदेव आणि मनुष्य यांची मुक्ती एकसारखीच असते हेही स्पष्ट केले आहे.

**अध्याय चवथा - 'फलाध्याय'**

हा शेवटचा अध्याय सर्वात लहान अध्याय असून त्यात ७८ सूत्रे व ३८ अधिकरणे आहेत. या अध्यायात जीवाचा, मृत्यूनंतर, अर्चिरादी किंवा देवयान मार्गाने - प्रकाशमार्गाने, देवांच्या मार्गाने, ब्रह्मलोकापर्यंत प्रवास कसा होतो त्यावर विवेचन केले आहे.

ज्याला मोक्षाची किंवा मुक्त होण्याची इच्छा असते त्याने श्रवण करणे - आत्मा/ब्रह्म व त्यासंबंधी विवेचन असलेल्या शास्त्रग्रंथांचे पठण, वाचन वा त्याबद्दल ऐकणे, चिंतन, मनन असा अभ्यास, हे सर्व साक्षात्कार होईपर्यंत करणे जरूरीचे आहे. उपनिषदांतून वर्णन केलेल्या निरनिराळ्या उपासना वा ध्यानधारणा, या जीवाला मोक्षप्राप्तीसाठी मदत करतात. ब्रह्मज्ञान - ब्रह्माचे ज्ञान मिळविल्यानंतर, अनेक जन्मांतून साठलेल्या संचित कर्मांची बंधने नष्ट होतात. त्यानंतर केलेल्या कर्माचे बंध निर्माण होत नाहीत. या जन्मात असलेले प्रारब्ध - या जन्मातील कर्मामुळे निर्माण झालेले बंध मात्र या जन्मातच अनुभवून - त्याचे परिणाम भोगून संपवावे लागतात.

ज्या जीवांनी, निरनिराळ्या आध्यात्मिक मार्गांनी - तप, श्रद्धा, ब्रह्मचर्यपालन (ब्रह्मप्राप्तीसाठी केलेले आचरण), तसेच ब्रह्मावर ध्यानधारणा इत्यादी केलेले असेल, (तसेच तेजाच्या पंधरवड्यात म्हणजे खरे तर शुद्ध जाणीव व अभ्यासमय जीवनक्रम असलेल्या काळात) मृत्यू पावलेले असे सर्व जीव, अर्चिरादी मार्गाने - प्रकाश मार्गाने, ब्रह्मलोकास जातात, जेथून परत या मृत्युलोकात यावे लागत नाही. त्यांच्यासाठी 'अतिवाहिक' नावाचे मार्गदर्शक, अशा जीवाला प्रकाशाच्या निरनिराळ्या स्थानांमधून नेऊन ब्रह्मलोकात पोचवतात.

निरनिराळ्या उपनिषदांत या अर्चिरादी मार्गाबद्दल केलेल्या विवेचनातील विरोधाभासांवर खुलासे करून या अध्यायात त्यांचा निरासही केला आहे.

या सर्व विवेचनाचा शेवट 'अनावृत्ती शब्दात्' असे, त्यावर जोर देण्यासाठी दोन वेळा म्हणून केला आहे. त्याचा अर्थ हाच की (शास्त्रांनी स्पष्ट केलेले असल्यामुळे) ब्रह्मलोकात पोचलेल्यांना पुन्हा येणे-या इहलोकात-मृत्युलोकात परतणे यानंतर नाही. मुक्तपुरुषाचे वर्णन या विवेचनात, जरूर त्या ठिकाणी केले आहे. याबाबतच्या जैमिनी, अदुलोमी व बद्री यांच्या मतांचाही उल्लेख केला आहे.

**ब्रह्मसूत्रावरील भाष्ये**

शंकराचार्य, भास्कर, यादवप्रका, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, निंबार्काचार्य, श्रीकंठ, श्रीपती, वल्लभाचार्य, शुक, विज्ञानभिक्षु, बलदेव यांनी नंतरच्या काळात ब्रह्मसूत्रांवर भाष्ये लिहिली आहेत (सातव्यापासून सतराव्या शतकापर्यंत) व आपले अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत वगैरे सिद्धांत, त्यात कसे सांगितले आहेत तेही सांगितले आहे. या भाष्यांचा अभ्यास हा फार मोठा व वेगळ्या अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा या लेखाचा येथेच समारोप करणे योग्य होईल.

(पृष्ठ क्र.४० वर)

आळसाचा प्रवास इतका सावकाश असतो की दारिद्र्य त्यास ताबडतोब गाठते!

# राष्ट्रभक्ती - एक अनिवार्य विषय

*राष्ट्रभक्तीची बीजं मुलांच्या मनात पेरण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील असायला हवं. आपल्या प्रत्येक कृतीतून, आपल्या प्रत्येक विचारातून, आपल्या प्रत्येक आचारातून, राष्ट्रभक्ती परावर्तित व्हायला हवी. याचा ऊहापोह या लेखात विशद केला आहे – संपादक*

१५ ऑगस्टला संध्याकाळी माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे मी वर्तमानपत्र घेऊन बसले. एका नामांकित वर्तमानपत्राच्या अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनचा विशेषांक हाती आला. नाव वाचूनच मनात आशा पल्लवित झाल्या. नक्कीच काहीतरी देशभक्तीने ओतप्रोत, विधायक, विचारांना दिशादर्शक असं काही वाचनात येईल. पण खेदाने सांगावसं वाटतं की त्या विशेषांकाचे मुखपृष्ठ संपूर्ण जाहिरातींनी भरलेलं होतं. स्वातंत्र्यदिनानिमित्त कोणत्या वस्तूवर किती टक्के सूट दिली आहे याचं वर्णन करणारं. माझ्या मोठ्या लेकीने लगेच त्यावर झडप घातली आणि कोणकोणत्या वस्तू खरेदी करायच्या याची यादी करू लागली. मला म्हणाली, 'वाव आई किती छान सेल लागलाय. असा इंडिपेंडेंस डे रोज यावा. धमाल धमाल नुसती खरेदी करत राहू आम्ही.' कहर म्हणजे त्या विशेषांकाच्या आतल्या पानातही अर्धी जागा जाहिरातीनेच व्यापलेली होती. माझ्या लेकीचा आनंद पाहून हसावं की रडावं हेच मला कळेनासं झालं. अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिन आपण कोणत्या पद्धतीने या तरुण मंडळींच्या समोर मांडलाय किंवा मांडतोय असा प्रश्न माझ्यातल्या अस्वस्थ आईला पडला आणि खरोखरच मला अगदी दीन झाल्यासारखं वाटू लागलं. गेली ७४ वर्षं जिवापाड जपलेल्या आपल्या भारताच्या स्वातंत्र्याची तरुण पिढीला किंवा आपल्यालाही किती किंमत उरलीय? असं माझं मनच मला विचारायला लागलं. सध्या राजकीय पटलावर दिसणार काही नेत्यांचं पर्यायानं नागरिकांचे वर्तन पाहिल्यानंतर हेच का आपलं देशप्रेम, हीच का आपली राष्ट्रभक्ती, हीच का आपली बंधुत्वाची भावना, हेच का आपलं स्वातंत्र्याचे मोल? असे एकामागून एक सगळे अनुत्तरीत प्रश्न मनःपटलावर उमटू लागले. जन्मजात, विनासायास, अगदी फुकट स्वातंत्र्य मिळालेल्या आपल्यासारख्या भारतीय नागरिकांना स्वातंत्र्याची खरी किंमत जाणून घेण्याची एक नामी संधी सध्या उपलब्ध आहे. स्वातंत्र्याची किंमत काय असते, एका रात्रीत ते आपल्याकडून हिरावून घेतल्या नंतर काय वाटतं, आपल्या स्वतःच्याच देशात आश्रित म्हणून बंधनात राहताना काय अनुभव येतो, हतबलता म्हणजे काय, असुरक्षितता म्हणजे काय हे जाणून घ्यायचं असेल तर अफगाणिस्थानामधील नागरिकांचे हाल बघावे लागतील. तिथल्या सद्यपरिस्थितीवरून आपण निदान काहीतरी बोध घ्यायला हवा.

आपला देश, आपले राष्ट्र, आपल्या देशावरचं आपलं प्रेम, आपल्या देशबांधवांबद्दलची आपुलकी याचा आपल्याला स्वातंत्र्या इतकाच अभिमान वाटायला हवा, नव्हे हा भारतीयांचा रक्त गुणधर्मच व्हायला हवा. देशाने मला काय दिलं ? असं सहजपणे परदेशात जाऊन स्थायिक होण्याची स्वप्न पाहणारी मुलं विचारतात तेव्हा त्यांना अगदी ठणकावून सांगण्याची आता वेळ आली आहे की, जन्मापासून आतापर्यंत स्वतःच्या ओळखीसोबतच स्वतःची अस्मिताही ज्या देशाने जपली त्या उपकाराला ही मंडळी किती सहजपणे विसरतात.

खरंतर स्वतःच्या कुटुंबाप्रमाणेच भारत सुद्धा माझं कुटुंब आहे. सगळे भारतीय माझे बांधव आहेत. हे

बाळकडू जर घरातूनच बालपणापासून साऱ्यांना मिळत गेलं तर 'भारतात काय ठेवलंय?' हा प्रश्न त्यांना कधीच पडणार नाही. मला वाटतं आपल्यासारख्या मध्यम वयाच्या नागरिकांची जबाबदारी आत्ता वाढली आहे. आपल्या मुलांना, आपल्या नातवंडांना थोडक्यात आपल्या भारताच्या भविष्याला देशाबद्दल आत्मीयता वाटेल असं वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी नव्हे हे कर्तव्य आता आपल्या खांद्यावर आहे. इंग्रजांनी घालून दिलेल्या शिक्षण पद्धतीमुळे मुलं राष्ट्र या संकल्पनेपासून दुरावत चालली आहेत. त्यामुळे आता गरज आहे ती इंडिया इज माय कंट्रीपेक्षा भारत माझा देश आहे ही ममत्वाची भावना भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून मुलांच्या मनावर अगदी लहानपणापासूनच बिंबवण्याची. हवंतर एखाद्या वेळेस दिवाळी का साजरी करतात हे मुलाला सांगता आलं नाही तरी चालू शकेल. पण १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण प्रत्येक भारतीय का साजरा करतो हे मात्र त्याला सांगता यायलाच हवं. ही राष्ट्रभक्तीची बीजं मुलांच्या मनात पेरण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील असायला हवं. आपल्या प्रत्येक कृतीतून, आपल्या प्रत्येक विचारातून, आपल्या प्रत्येक आचारातून, राष्ट्रभक्ती परावर्तित व्हायला हवी. देशप्रेम म्हणजे बंदूक हातात घेऊन सीमेवर लढायला उभे राहणं एवढाच त्याचा मर्यादित अर्थ नाही. देशाच्या प्रगतीसाठी उपकारक अगदी लहानात लहान कृतीसुद्धा देशप्रेमच आहे हे या तरुणाईला समजावून सांगण्याची, त्यांच्या गळी उतरवण्याची आता वेळ आलेली आहे. नाहीतर सद्य परिस्थिती पाहता, धर्मा धर्मातला असंतोष पाहता, एकंदरीतच देशाच्या बाबतीत उदासीनता पाहता आपलाही अफगाणिस्थान व्हायला उशीर लागणार नाही आणि त्यासाठीच भारत आणि इंडिया ही दरी कमी होऊन एकत्रित हिंदुस्थान नांदला पाहिजे असं मला वाटतं...

जगातील सर्वात जुनी, मोठी आणि सातत्यपूर्ण चालणारी संस्कृती आपल्या भारताची आहे. त्यासोबतच तिचा एक सर्वात मोठा गुण म्हणजे ती सर्वसमावेशक आहे. या सर्वसमावेशकतेमुळेच देशादेशांतील सीमा अनेक अर्थांनी गळून पडलेल्या आहेत. जगाचं एका वैश्विक खेड्यात रूपांतर झालं आहे. या रूपांतरणामध्ये भारत जर स्वतःची ओळख व अस्मिता विसरत चालला असेल तर त्याला कुठेतरी आपणच जबाबदार आहोत. म्हणतात ना ..

बहुत दूर तक अंधेरा है इस मे कुछ हिस्सा मेरा है।

राष्ट्रगीताच्या वेळी अभिमानाने देशाला वंदन करण्यासाठी ५३ सेकंद आपण उभं राहणं हे आपलं देशाप्रती पवित्र बंधनसुद्धा आपल्याला जर जाच वाटत असेल तर खरोखर विचार करण्याची वेळ आली आहे. हा विचार का करायचा हे नुकतंच आपल्याला अफगाणिस्थानने उदाहरणासहीत दाखवून दिलेलं आहे. सध्या वर्तमानपत्रातून आणि बातम्यांमधून अफगाणिस्थान बद्दल आलेले वार्तांकन किंवा तिथली छायाचित्र पाहून फक्त अस्वस्थ होऊन चालणार नाही तर कुठेतरी आपल्याला आत्मपरीक्षण करावं लागणार आहे. ती फक्त बातमी आहे म्हणून त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणारच नाही. कारण एका रात्रीत काय घडू शकतं? हे सध्या आपल्याला दिसतंय. आपले स्वातंत्र्य अबाधित राखून महासत्ता होण्याचे स्वप्न जर आपल्याला पूर्ण करायचं असेल तर सगळ्यात पहिल्यांदा भारताच्या प्रत्येक नागरिकाने भारताला एक मजबूत राष्ट्र बनवण्याच्या कामी आपलं संपूर्ण योगदान द्यायला हवं. आपलं राष्ट्र जर मजबूत नसेल तर आपण कमवलेला पैसा, आपला बंगला, गाडी, व्यापार-व्यवसाय, बचत, शिक्षण, हुद्दा सगळं निरर्थक ठरेल. कुठलीही व्यवस्था न करता केवळ एका रात्रीत सगळ्यावर पाणी सोडावं लागेल. कारण मजबूत आणि सुरक्षित राष्ट्रातच तिथले नागरिक निर्भयपणे राहू शकतात.

या सामर्थ्याच्यासोबतच राष्ट्राचं स्वावलंबीत्वसुद्धा तितकेच महत्त्वाचं आहे. भारतातल्या बुद्धीचा ओघ जर परदेशात असाच जात राहिला तर मात्र आपण परावलंबी होऊ शकतो. जर छोट्या छोट्या गोष्टींसाठी इतर देशांवर आपल्याला अवलंबून राहावं लागलं तर मात्र आपल्या मालकीच्या वस्तूंनाही काडीची किंमत उरणार नाही. या आत्मनिर्भरतेसाठीच त्या दृष्टीने प्रयत्नशील राहण्यासाठी सध्या सुरू असलेली वोकल फोर लोकल ही कार्यप्रणाली मार्गदर्शक ठरावी.

यासोबतच आपलं सैन्य अतिशय ताकदवान आणि अद्ययावत युद्धसामग्रीने सुसज्ज असायला हवं. राष्ट्रासोबतच सैनिकांबद्दलही आपल्याला तितकाच आदर असायला हवा. कुणाच्यातरी मदतीवर आम्ही युद्ध जिंकू अशी परिस्थिती कोणत्याही परिस्थितीत भारताला मान्य नसावी इतकं आपलं सैनिकी सामर्थ्य आपण वाढवायला हवं. आणि त्यासाठी जास्तीत जास्त तरुणांनी शरीर कमावून सैन्यात भरती व्हायला हवं. वेळच आली तर तितक्याच ताकदीने देशहितासाठी योग्य निर्णय घेण्याची क्षमता तसेच राष्ट्र सुरक्षेसंदर्भात ठोस निर्णय घेण्याची क्षमता, आपल्या सरकारकडे असायलाच हवी किंबहुना नागरिकांनी त्या बाबतीत तसं आग्रही असायला हवं. नाहीतर आपण स्थानिक पातळीवर कितीही सामर्थ्यवान असलो तरी त्या सामर्थ्याला काहीच मोल उरत नाही आणि मग अशा परिस्थितीत अफगाणिस्थानातील नागरिकांप्रमाणे कदाचित एखाद्या दिवशी अक्षरशः विमानाला लटकून आपल्याला देशातून पळ काढावा लागेल.

सोबत ही सुद्धा जाणीव प्रत्येकाला असायला हवी की आपण निवडून दिलेले नेतृत्व कोणत्याही परिस्थितीत कमकुवत पडायला नको. राष्ट्र चालवण्यासाठी, राष्ट्राला दिशा देण्यासाठी ते नेतृत्व जर सक्षम नसेल तर सर्वकाही असूनही देशातील नागरिकांना आश्रित बनण्यास वेळ लागणार नाही. जर नेतृत्व कमकुवत असेल तर ते अशा संकटसमयी चक्क पळ काढून स्वतःचा जीव वाचवत बसेल आणि इकडे देशातील नागरिक जीव घेऊन पळत सुटतील. अफगाणिस्थानसारखं एखादं नेतृत्व शरणागती पत्करून देशाचा सौदा करू शकेल आणि म्हणूनच निवडणुकीच्या निवड प्रक्रियेत स्वतः अमूल्य मत मतपेटीत बंद करताना प्रत्येकाने नक्की विचार करायला हवा की मी निवडलेलं सरकार, मी निवडलेला माझा नेता, थोडक्यात माझी निवड जर राष्ट्रावर संकट आलं तर एखाद्या अभेद्य भिंतीप्रमाणे संपर्णू ताकदीनिशी राष्ट्ररक्षणार्थ उभं राहिल. कोणत्याही परिस्थितीत पळपुटेपणा करणार नाही. आणखी एक गोष्ट प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवी की जात, धर्म, भीती, फुकट मिळणाऱ्या वस्तू यांच्या मोबदल्यात कधीही मत दिले जाऊ नये. आपलं सरकार पर्यायाने आपला देश मजबूत करण्यासाठी प्रत्येकाकडून मताच्या अधिकाराचा योग्य उपयोग व्हायलाच हवा. कारण शेवटी देश सुरक्षित तरच आपण सुरक्षित आणि म्हणूनच राष्ट्रभक्ती हा अनिवार्य विषय मूल्य शिक्षणासोबतच प्रत्येकाने आग्रहाने शिकला पाहिजे आणि शिकवला गेला पाहिजे. जय हिंद!

**– सौ. साधना जोशी**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे.

•••

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

जीवन बदलण्यासाठी वेळ ही सगळ्यांनाच मिळते, पण वेळ बदलण्यासाठी दोन वेळा जीवन मिळत नाही.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यातील उपक्रम**

२३ नोव्हेंबर २०२१ ला दुसऱ्या सत्राची सुरवात झाली.

मुलांना भाषा, गणित व परिसर अभ्यास याबरोबर चित्रकला, गाणी, गोष्टी, शारीरिक शिक्षण याच्याही तासिका घेतल्या जातात.

या तासिकांमध्ये भाज्यांचा वापर करून ठसेकाम (printing), चित्र काढणे, रंगवणे, हस्तकला (craft) असे उपक्रम घेतले जातात.

खालील विविध उपक्रम ज्यातून मुलांना स्वावलंबनाचे धडे मिळाले.

**३० नोव्हेंबर २०२१ –** शिक्षक व पालक यांच्या मार्गदर्शनाखाली सिनीयर के. जी. च्या मुलांनी 'कणकेच्या पोळ्या' या उपक्रमाचा आनंद लुटला.

- **१० डिसेंबर २०२१ –** सिनीयरच्या मुलांनी मटार सोलण्याची कृती आनंदाने केली. मटार वापरून केल्या जाणाऱ्या अनेक पाककृती मुलांनी शिक्षकांना सांगितल्या.
- **१७ डिसेंबर २०२१ –** नरसाळ्याचा (funnel) वापर करून पाणी बाटलीत ओतणे.
- **२८ डिसेंबर २०२१ –** घराची स्वच्छता.
- **७ डिसेंबर २०२१ –** कपड्यांच्या घड्या घालणे.
- **२० डिसेंबर २०२१**
- नर्सरी व ज्यूनियर – बडबडगीत (गाणे) दिवस.
- सिनीयर के. जी. – राईम डे.

नर्सरी व ज्यूनियरच्या विद्यार्थ्यांना भाषेचे बंधन न ठेवता कुठलेही एक गाणे हावभावांसहित म्हणावयाचे होते.

सिनीयर के. जी.च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील राईम हावभावांसहित म्हणायची होती.

या उपक्रमाला मुलांनी उत्तम प्रतिसाद दिला.

- **२४ डिसेंबर २०२१ – नाताळ**

२५ डिसेंबरला जगभरात साजरा केला जाणारा ख्रिश्चन धर्मीयांचा सण म्हणजे नाताळ. २४ डिसेंबर मुलांनी लाल व पांढरे कपडे परिधान केले होते. या सणाची माहिती मुलांना चित्रांद्वारे सांगण्यात आली. या सणासंबंधीची गाणी लावून (video) मुलांनी त्यावर नृत्य केले.

- नर्सरी – शाळेच्या वेबसाईटवर मुलांना रंगवण्याकरता चित्र अपलोड केले गेले.
- ज्यूनियर व सिनीयर के. जी. – हिरव्या रंगाचा कागद (craft paper) वापरून मुलांनी ख्रिसमसचे झाड तयार केले व आजूबाजूला सजावटही केली.
- **३१ डिसेंबर २०२१ – सिनीयर के. जी. मोनॅको बिस्किट चाट**

या पाककृतीसाठी लागणारे सर्व साहित्य एकत्र करून मुलांनी बिस्कीट चाट तयार केले. आपल्या शिक्षक व पालकांच्या मार्गदर्शनाखाली ही पाककृती तयार करून मुलांनी त्याचा आस्वाद घेतला.

---

सुरुवात कशी झाली यावर बऱ्याच घटनांचा शेवट अवलंबून असतो!

खाण्याच्या चांगल्या सवयी, स्वच्छतेविषयी सूचना शिक्षकांनी मुलांना दिल्या.

येणाऱ्या नवीन इंग्रजी वर्षाच्या शुभेच्छा देऊन शिक्षकांनी मुलांची रजा घेतली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**ऑनलाईन आंतरराष्ट्रीय स्पेल बी परीक्षेचा निकाल (२०२१-२२)**

ऑनलाईन आंतरराष्ट्रीय स्पेल बी परीक्षेचा दुसऱ्या स्तराचा निकाल लागलेला असून, सौ. ए. के. जोशी शाळेच्या प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे :

**उच्चक्रमांक पटकाविलेले विद्यार्थी :**

| अनु. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. |
|---|---|---|
| १. | जेनिता जितेंद्र लोणे | १ली |
| २. | सान्वी कार्तिक मुडबिडरी | २री |
| ३. | युक्ता धिरज झगडे | २री |
| ४. | कार्तिकी जगदीश शिंदे | ४थी |

**डिस्टीग्कशन पटकाविलेले विद्यार्थी :**

| अनु. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | अन्वी हृषिकेश केळकर | १ली | ९६ |
| २. | तनय नीतिन कारेकर | १ली | ९० |
| ३. | ओजस प्रकाश घाग | २री | ९७ |
| ४. | रेवा पिंपळे | २री | ९६ |
| ५. | अथर्व समीर रानडे | २री | ९१ |
| ६. | काव्या मिस्त्री | २री | ८७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | विआन जयेश डोके | ४थी | ९७ |
| ८. | अनिका आशुतोष गोळे | ४थी | ८९ |

**अचिव्हमेंट कॅटेगिरी पटकावलेला विद्यार्थी :**

| अनु.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | शौर्य समीर मोडक | ३री | ५६ |

सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

**सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेत ऑन लाईन जागतिक गणित दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन (२०२० - २०२१)**

**ऑन लाईन जागतिक गणित दिवस**

दरवर्षी २२ डिसेंबर रोजी गणित दिवस साजरा केला जातो. अर्थात 'गणित दिन' हा संपूर्ण भारतासाठी अत्यंत अभिमानाचा दिवस, आजच्याच दिवशी महान गणिततज्ज्ञ श्रीनिवासरामानुजन यांचा जन्म झाला होता. जगभरात हा दिवस 'गणित दिन' म्हणून साजरा केला जातो.

या वर्षी सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेमधून प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'गणित दिन' ऑनलाईन पद्धतीने साजरा केला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गणिततज्ज्ञ श्रीनिवासरामानुजन यांच्याविषयी माहिती देऊन सुरवात केली.

त्याचप्रमाणे गणिताचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात कशा प्रकारे होतो याची माहिती देऊन विविध प्रकारची गणित विषयांवर आधारित गाणी गायली. इयत्ता १ लीच्या विद्यार्थ्यांनी विविध आकार घेऊन निरनिराळी चित्रे बनवली. इयत्ता २ रीच्या विद्यार्थ्यांनी अंक खेळ खेळला.

इयत्ता ३ रीच्या विद्यार्थ्यांनी पुठ्याच्या साहाय्याने आकर्षक अशी घड्याळे बनवली. यातून त्यांची कलाकृतीची

जाणीव दिसून आली. इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांनी कार्डांवर शब्दकोडे बनवून कार्डाला विविध रंगीबेरंगी पद्धतीने सजविले. अशा प्रकारे 'गणित दिवस' मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

**आय. पी. यम. मेगा अंतिम परीक्षा निकाल (२०२१)**

इन्स्टिट्यूट फॉर प्रमोशन ऑफ मॅथेमॅटिक्स (IPM) परीक्षेचा निकाल लागलेला असून सौ. ए. के. जोशी शाळेच्या प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे :

**उच्च क्रमांक पटकाविलेले विद्यार्थी :**

| अनु. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. | मेगा अंतिम रँक |
|---|---|---|---|
| १. | कु. मोहित शिंदे | २री | १७५ |
| २. | कु. वैभवी होसिंग | ३री | ८२ |
| ३. | कु. स्नेहा पाटील | ४थी | १३४ |
| ४. | कु. सुमेध वेलणकर | ४थी | १४५ |
| ५. | कु. अनिश बर्वे | ४थी | १६६ |
| ६. | कु. आयुष सारंग | ४थी | १६७ |
| ७. | कु. अद्वय परांजपे | ४थी | २२२ |

सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !!

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**'स्पेल बी'आंतरराष्ट्रीय प्रादेशिक व राज्यस्तरीय स्पर्धा निकाल (स्तर २)**

**सर्वोत्कृष्ट श्रेणी**

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|
| तन्वी मेंढूरवार | सातवी |

**विशेष योग्यता श्रेणी**

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | स्थान |
|---|---|---|
| राधिका रणदिवे | पाचवी | ७७ |
| सान्वी जोग | सातवी | ८४ |
| अनन्या बोदाडे | आठवी | ७९ |

**योग्यता श्रेणी**

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | स्थान |
|---|---|---|
| अंतरा बागल | सातवी | ७४ |
| पुष्कर जिकामडे | सातवी | ६७ |
| पलक चौधरी | सातवी | ६७ |

**प्राप्त पारितोषिके**

१) भारत विकास परिषदेतर्फे श्री. केशव चौधरी यांना ''सर्वोत्कृष्ट शिक्षक'' पुरस्कार प्राप्त झाला असून विजयचिन्ह आणि प्रमाणपत्र हे पुरस्काराचे स्वरूप आहे.

२) भारत विकास परिषदेतर्फे कुमारी मृण्मयी गांगल आणि कुमार इशान फणसे या दोन विद्यार्थ्यांना 'सर्वोत्कृष्ट विद्यार्थी' पुरस्कार प्रदान केला असून पदके आणि प्रमाणपत्रे असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

**राष्ट्रीय गणित दिन**

सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम ठाणे या शाळेत श्रीनिवासन् रामानुजन् यांच्या जन्मदिनी दिनांक २२ डिसेंबर रोजी राष्ट्रीय गणित दिन साजरा केला गेला. गणित तज्ज्ञांनी निर्माण केलेल्या सोप्या वैदिक पद्धतीने गुणाकार व पाढे कसे आत्मसात करायचे याचे स्पष्टीकरण विद्यार्थ्यांनी केले. विविध भौमितीय कोन व त्याचे प्रकार लक्षात कसे ठेवायचे यावर नृत्य सादर केले. तसेच

क्रमाने कंस सोडविणे यासाठी भागाकार, गुणाकार, बेरीज, वजाबाकी यांवर 'बोडमास' गाणे गाऊन गणिताचे अध्ययन करण्याचे कौशल्य दाखवले. श्रीनिवासन् रामानुजन यांची यशोगाथा, (अ +ब ) २ सोडवण्याची सोपी पद्धत, तसेच 'गणिताची मौज' ही सुंदर कविता आणि गणिती सूत्रांचे तक्ते फलकावर लावले.

'राष्ट्रीय गणित दिवस' जरी संगणकाद्वारे ऑनलाईन पद्धतीने साजरा केला असला तरी मुलांनी त्याचा आनंद लुटला. त्याचप्रमाणे प्रत्येक स्पष्टीकरण व्यवस्थित समजून घेतली.

'राष्ट्रीय गणित दिवस' साजरा करण्याची संधी दिल्याबद्दल, तसेच संगणकाद्वारे ऑनलाईन कार्यक्रमात सहभागी करून घेतल्याबद्दल विद्यार्थ्यांनी विद्यालयाचे आभार मानले.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### आवाज की दुनिया

दि. २९ ऑक्टोबर रोजी ठाण्याच्या जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयातील संज्ञापन आणि पत्रकारिता विभागाच्या वतीने प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''आवाज की दुनिया'' हा विशेष कार्यक्रम ऑनलाइन स्वरूपात संपन्न झाला. या कार्यक्रमास सर्वजण गुगल मीट द्वारे जोडले गेले होते.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांनी मोलाचे मार्गदर्शन केले व पत्रकारिता विभागाचे समन्वयक उपप्राचार्य डॉक्टर महेश पाटील सर यांच्या प्रमुख देखरेखीखाली सह. प्राध्यापिका मानसी जंगम यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी साक्षी जाधव हिने केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय तृतीय वर्षातील विद्यार्थी विघ्नेश देसाई यानी करून दिला.

या विशेष कार्यक्रमाला व्याख्यात्या म्हणून रेडिओ जॉकी, निवेदिका, मुलाखतकार, प्राध्यापिका आणि आवाजाच्या दुनियेतील ब्रँडनेम असणाऱ्या रश्मी चंद्रकांत वारंग या लाभल्या होत्या. एकवीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या आर. जे. रश्मी वारंग मॅडम यांनी आवाज की दुनिया या कार्यक्रमात आकाशवाणी बद्दल संपूर्ण ज्ञान देत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले.

आपला चेहरा दिसत नसला तरी आपला आवाज आपली ताकद असते व आपला आवाज आपली ओळख कसा बनवू शकतो हे त्यांनी सांगितले. तसेच श्राव्य माध्यमांमध्ये रेडिओ, आकाशवाणी याखेरीज अनेक कोणकोणती क्षेत्रे खुली आहेत याबद्दलची थोडक्यात माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. श्राव्य माध्यमांमध्ये काम करण्यासाठी आवाजावर कोणत्या प्रकारची मेहनत घ्यावी, त्याचसोबत कोणत्या गोष्टींचा अभ्यास असणे गरजेचे आहे याबद्दलचे मार्गदर्शन या कार्यक्रमाद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमा अखेरीस विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचीही त्यांनी सहज संवाद साधून उत्तरे दिली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि जनसंज्ञापन व पत्रकारिता विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील सर, तसेच विभागाच्या प्राध्यापिका डॉ. विमुक्ता राजे मॅडम, मानसी जंगम मॅडम, प्राची नितनवरे मॅडम आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते. तसेच जन संज्ञापन आणि पत्रकारिता विभागातील तीनही वर्षांतील ९० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचा शेवट प्रथम वर्षीय विद्यार्थिनी वेदिका कंटे हिने आभार प्रदर्शनाने केला.

**जोशी बेडेकर महाविद्यालयात क्रिसलिस २०२१ महोत्सव संपन्न**

**भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या विषयावर विचारांचा जागर**

१८ डिसेंबर २०२१ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात क्रिसलिस २०२१ या आंतरमहाविद्यालयीन महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. क्रिसलिस म्हणजे कोशात असलेल्या सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतर होणे. या विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणाऱ्या या महोत्सवाचे आयोजन महाविद्यालयाच्या माध्यम आणि व्यवस्थापन विभागाद्वारे करण्यात आले होते. कोरोनाची पार्श्वभूमी लक्षात घेत संपूर्ण कार्यक्रम क्रिसलिसच्या अधिकृत यू ट्यूब चॅनेलवर प्रसारीत करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून बिझनेस इनसाईडर इंडियाचे मुख्य संपादक श्री. श्रीराम अय्यर आणि ग्लोबल शेअर्ड सर्विसेसचे प्रमुख श्री. अजय बायस हे उपस्थित होते.




व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, क्रिसलिस समन्वयक प्रा. अर्चना नायर, डॉ. विमुक्ता राजे हे उपस्थित होते. या वर्षीचा ख्रिसलीस महोत्सव ''आजादी का अमृत महोत्सव (INDI-75 EMERGE)'' या विषयावर समायोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थीनी सई गुजर हिने केले.



कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, तसेच क्रिसलिसचा विद्यार्थी प्रमुख ध्रुव कदम यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. पुढे प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन आणि ख्रिसलीसच्या आयोजक विभागाचे कौतुक केले. आपल्या भाषणात त्यांनी विशेषतः स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या ७५ वर्षांतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या यांच्या भूमिकेवर भाष्य केले. त्यानंतर कार्यक्रमाची संपूर्ण माहिती देत ध्रुव कदम याने आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व वक्ते श्री. श्रीराम अय्यर यांनी ''भारताचा स्वातंत्र्यानंतरचा ७५ वर्षांतील प्रवास माध्यमांच्या दृष्टिकोनातून कसा होता'' या विषयावर भाष्य केले. ते म्हणाले की, ''सामान्य माणूस आणि माध्यमे यांच्यात माहितीची पोकळी निर्माण झाली आहे. यामुळे बऱ्याच विमा योजना, गुंतवणूकीच्या संधी अशा अनेक विषयांपासून सामान्य माणूस वंचित राहिला आहे. त्याचबरोबर माध्यमांचे स्वातंत्र्य आणि योग्य ती माहिती मिळवण्यासाठी सामान्य जनतेने मनोरंजनात्मक आणि निरुपयोगी मजकुरावर प्रखरपणे टीका केली पाहिजे'' असे देखील सांगितले.




देशाच्या सर्वांगीण विकासात युवा वर्ग महत्त्वाची भूमिका बजावत आहे आणि यशाच्या मागे लागलेल्या आपणा सर्वांना आनंद व सुखाची प्राप्ती होण्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे ते म्हणजे आपापसात संवाद साधून विचारांची देवाणघेवाण करणे असे प्रतिपादन श्री. अजय बायस यांनी केले.

उद्घाटनानंतर महाविद्यालयाच्या विविध विभागांतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत ''भारतातील तरुण-आत्मनिर्भर होण्यासाठी कौशल्य वाढवत आहेत'' या विषयावर परिसंवाद झाला. त्यानंतर व्यवस्थापन विभागाच्या शेरलॉक होम्स, कॉर्पोरेट सुट, इनवेस्ट-ओ-वॉर तसेच माध्यम विभागाच्या फ्लॅश अप, २५ FPS, रील ऑफ फॉर्च्यून अशा विविध स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. एकूण ४१ महाविद्यालयांतील तब्बल ३६४ विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता.

कार्यक्रमाच्या समारोप सत्राला लेफ्टनंट जनरल अनिल मलिक हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी तरुणांनी जीवनातील आव्हानांना निडरपणे सामोरे जावे असा संदेश त्यांनी आपल्या भाषणातून दिला दिला. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी संपूर्ण कार्यक्रमाबद्दल आपले मत मांडले आणि अधिकाधिक स्पर्धा जिंकून विजयी ठरलेल्या मॉडेल महाविद्यालयाचे अभिनंदन करून त्यांना फिरता चषक देण्यात आला. त्यानंतर क्रिसलिसचा विद्यार्थी प्रमुख ध्रुव कदम याने आपल्या सर्व सहकारी विद्यार्थ्यांचे, तसेच कर्मचारी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**कोविड महामारीच्या काळात आशादायी जगणे महत्त्वाचे : फ्रँकलिन ॲबॉट**


**डॉ वा.ना. बेडेकर व्याख्यानमालेचे ३२वे व्याख्यान संपन्न**



विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेतील ३२ वे व्याख्यान सोमवार दिनांक २० डिसेंबर २०२१ रोजी पार पडले. या व्याख्यानासाठी प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ आणि सल्लागार श्री. फ्रँकलिन ॲबॉट, हे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते त्यांनी 'जीवन हे जोखीम घेण्यासारखे आहे' या शीर्षकावर व्याख्यान दिले. तसेच त्यांनी जागतिक महामारी कोव्हिड-१९ या विषयावर देखील चर्चा केली.

व्याख्यानाच्या सुरुवातीला डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी कै. डॉ. वा.ना. बेडेकर यांचे शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान विषद केले. तसेच पाहुण्या वक्त्याचा थोडक्यात परिचय देखील करून दिला. त्यानंतर

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी आपले उद्‌घाटनपर भाषण देताना आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी सहकार्याची गरज अधोरेखित केली, तसेच तरुण पिढीला मानसशास्त्रीय समुपदेशनाविषयी अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.



कवी आणि मनोचिकित्सक फ्रँकलिन ॲबॉट दक्षिणपूर्व युनायटेड स्टेट्समधील अटलांटा येथे राहतात. त्यांनी मर्सर युनिव्हर्सिटी आणि युनिव्हर्सिटी ऑफ जॉर्जिया स्कूल ऑफ सोशल वर्क येथून पदवी पर्यंतचे शिक्षण घेतले आहे. त्यांचे शोधनिबंध जॉर्जिया स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये विशेष संग्रहात ठेवलेले आहेत, तर त्यातील काही भाग आता जोशी बेडेकर महाविद्यालयात विशेष संग्रहात ठेवला आहे.

ॲबॉट हे मॉर्टल लव्ह आणि पिंक झिनिया या मूळ गाण्यांचे आणि 'डोंट गो बॅक टू स्लीप' या दोन कवितासंग्रहांचे लेखक आहेत आणि न्यू मेन-न्यू माइंड्स, मेन अँड इंटिमेसी आणि बॉयहूड : ग्रोइंग अप मेल या पुरुषत्वावरील तीन काव्यसंग्रहांचे संपादक आहेत.

व्याख्यानात फ्रँकलिन ॲबॉट यांनी कोविड महामारी आणि लॉकडाऊन दरम्यानच्या अनुभवांवर चर्चा केली. महामारीच्या झालेल्या दु:ख, नुकसान आणि पश्चात्ताप याबद्दल बोलताना त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत स्वत:ची काळजी घेण्यासाठी आपण पुढे काय करू शकतो यावर देखील भाष्य केले. अधिक सविस्तरपणे सांगण्यासाठी त्यांनी ख्यातनाम अमेरिकन कवयित्री एमिली डिकिन्सन यांच्या कवितांचा संदर्भ घेऊन कोविड-१९ महामारीच्या काळात आशेचे महत्त्व सांगितले.

'कुहू कुहू बोले कोयलिया' आणि 'चंद्रिका देख छाई' या हिंदी गाण्यांच्या संगीतमय सादरीकरणाने आणि मधुर सरोद संगीताने व्याख्यानाचा समारोप झाला. या व्याख्यानाचे विद्या प्रसारक मंडळाच्या यू ट्यूब चॅनलवर थेट प्रक्षेपण करण्यात आले आणि त्यावेळी अनेक शिक्षक व विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली. तर कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल नारायण बारसे व सर्व विभागप्रमुखांची देखील उपस्थिती होती.

**इंग्रजी विभाग आयोजित ॲड-ऑन कोर्स इन फंक्शनल इंग्लिश**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने आयोजित केलेला १५ दिवसांचा (३० तासांचा) ॲड-ऑन कोर्स इन फंक्शनल इंग्लिश ६ डिसेंबर ते २२ डिसेंबर २०२१ या काळात संपन्न झाला. विद्यार्थ्यांमधील रोजगाराभिमुख भाषिक कौशल्यांचा विकास करणे हे या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट होते. एकूण २९ विद्यार्थ्यांनी या कोर्ससाठी नावनोंदणी करून सक्रिय सहभाग घेतला.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातील प्रत्येक प्राध्यापक, तसेच महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील प्रा. फरहीन सईद, काळसेकर महाविद्यालयाचे प्रा. संजय कालेकर आणि दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रा. मानसी जावळे यांनी वेगवेगळ्या सत्रांत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अभ्यासक्रमात स्वनव्यवस्था, मूलभूत व्याकरण, व्यावसायिक संज्ञापन, अहवाल लेखन, वाचन, लेखन तसेच शब्दसंपदेचा विकास अशी वेगवेगळी मॉड्युल समाविष्ट होती. ॲड-ऑन कोर्ससाठी आवश्यक

असलेल्या कोर्सपूर्वीच्या आणि कोर्सनंतरच्या चाचण्या घेण्यात आल्या.

या कोर्सच्या समारोपाचे सत्र २२ डिसेंबर २०२१ रोजी उपप्राचार्या प्रियंवदा टोकेकर यांच्या उपस्थितीत पार पडले. तृतीय वर्ष इंग्रजीची विद्यार्थिनी अक्षता चव्हाणने सर्वांचे स्वागत केले. इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. प्रमोद खराटे यांनी आपल्या मनोगतात विश्वास व्यक्त केला की, हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी व्यावसायिक आव्हाने पेलण्यास, तसेच स्पर्धा परीक्षांत यशस्वी होण्यास समर्थ होतील. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रियांमधून कोर्सच्या आयोजकांबाबत समाधान आणि कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या उपप्राचार्या प्रियंवदा टोकेकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा आणखी कोर्सेसचे आयोजन करण्यास प्रोत्साहन दिले. तृतीय वर्ष इंग्रजीची विद्यार्थिनी प्रज्ञा जंगले हिने सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या कोर्ससाठी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, तसेच महाविद्यालयाची प्रशासकीय टीम आणि कार्यालयातील पराग शिंदे यांचे बहुमोल मार्गदर्शन आणि सहाय्य झाले.

**भारतीय नौदल दिन साजरा**

जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या NCC नौदल युनिटने ४ डिसेंबर २०२१ रोजी भारतीय नौदल दिन साजरा केला.

नौदल दिनाच्या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, हिंदी विभाग प्रमुख डॉ. अनिल ढवळे आणि डॉ. प्रकाश जंगले या मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी पुढील प्रदर्शने ठेवण्यात आली.

१) नौदल जहाज मॉडेल्सचे प्रदर्शन

२) प्रशिक्षण लाकडी रायफलचे प्रदर्शन आणि

३) सेमाफोर (संकेत/संदेश बोर्ड जहाजांवर अंतरावर प्रसारित केला जातो). आयएनएस विराट आणि आयएनएस कोलकाता यांचे प्रदर्शन, जहाजाचे विविध भाग, त्यांचे महत्त्व आणि इतर माहिती कॅडेट्सनी दिली आहे. ७.६२ मिमीची वुडन सेल्फ लोडिंग (SLR) रायफल प्रदर्शित करण्यात आली होती आणि कॅडेट्सनी सेमाफोरच्या माध्यमातून विविध अक्षरांचे प्रात्यक्षिक दाखवले. त्यात त्यांनी फ्लॅग सेमाफोर या सेमाफोर प्रणाली बद्दल थोडक्यात माहिती सांगितली. फ्लॅग सेमाफोर म्हणजे हाताने पकडलेल्या ध्वजांसह व्हिज्युअल सिग्नलद्वारे काही अंतरावर माहिती पोहोचवणे यात ध्वजांच्या स्थितीनुसार माहिती एन्कोड केली जाते.

वरील प्रदर्शनाला विद्यार्थी व शिक्षकांनी भेट देऊन त्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**मराठी भाषा विभाग**

**विभागीय सामाजिक जबाबदारी (DSR) उपक्रम अहवाल गुरुवार, ०९/१२/२०२१**

विद्या प्रसारक मंडळाचच्या जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाखाली विभागीय सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत मराठी भाषा विभागाने दिनांक ०९ डिसेंबर २०२१ रोजी टाकी पठार येथील विद्यालयाला भेट दिली. त्यावेळी मराठी विभागाचे प्रा. संतोष राणे यांनी कविता या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रा. शिशिर आंगणे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करून शालेय शिक्षणासोबत जीवनातील कलागुणांचे महत्त्व या विषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या कला

शाखेच्या द्वितीय वर्षातील मराठी विषयाच्या प्रातिनिधिक आठ विद्यार्थ्यांनी कविता वाचन तसेच इतर कलांचे सादरीकरण केले. या उपक्रमात टाकीपठार येथील स्थानिक विद्यार्थ्यांनी देखील कविता वाचन तसेच मुलांमध्ये असलेल्या कलागुणांना वाव देण्यासाठी घेण्यात आलेल्या कल्पनेचे नाट्य रूपांतर या खेळात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. त्यानंतर मराठी भाषा विभागातर्फे सर्व विजेत्यांना पुस्तके आणि पेन देऊन गौरवण्यात आले, तसेच मराठी भाषा विभागप्रमुख प्रा. अनिल भाबड यांच्या प्रस्तावाप्रमाणे सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना पेन, पेन्सिल, पुस्तके आणि चॉकलेट भेट देण्यात आली.

सदर उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रा. डॉ. विनोद चांदवानी, प्रा. सुदाम अहिरराव आणि विद्यार्थी प्रतिनिधी, तसेच टाकीपठार विद्यालयाचे समन्वयक श्री. धीरज पाटील यांच्या सहकार्यामुळे सुरळीतपणे पार पडला.

**रक्तदान शिबिर**

विद्या प्रसारक मंडळातील जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या NCC नेव्हल युनिटने गुरुवारी ९ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ९.३० ते ४.३० या वेळेत ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सदर शिबिराचे आयोजन कॉलेजच्या जिमखान्यात करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. प्रियंवदा टोकेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

रक्तदान शिबिरासाठी एकूण १२८ नोंदणीसह उत्तम प्रतिसाद मिळाला आणि त्यातून सुमारे ३५० मिलीच्या ५२ रक्त पिशव्या संकलित झाल्या. शिबिराचे आयोजन करताना महाविद्यालयाच्या NCC युनिटने कोरोनाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले. संपूर्ण शिबिर सुरळीतपणे पाड पडल्यानंतर या कार्यक्रमासाठी जिमखाना वापरण्याची परवानगी दिल्याबद्दल NCC नेव्हल युनिटतर्फे प्राचार्या, डॉ. सौ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य डॉ. प्रियंवदा टोकेकर, सहाय्यक प्रा. सुभाष शिंदे आणि डॉ. प्रमोद खराटे यांचे मनापासून आभार मानण्यात आले. त्याचबरोबर एनसीसी नेव्हल युनिटला रक्तदान शिबिराच्या आधी आणि दरम्यान केलेल्या बिनशर्त सहकार्याबद्दल रोहिणी डोंबे आणि विजय पाटील यांचे एनसीसी नेव्हल युनिटचे लेफ्टनंट डॉ. दीपक पोपट साबळे यांनी आभार मानले.

**टॅलेंट अकादमी स्पर्धा २०२१-२२**

महाविद्यालयातील सर्व तरुण नवोदित कलाकारांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध कला क्षेत्रातील टॅलेंट अकादमी स्पर्धांचे आयोजन केले जाते. कलाकारांच्या कलागुणांना वाव देणे हाच या स्पर्धांचा उद्देश असतो. या स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये पार पडल्या. पहिली फेरी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये कनिष्ठ तसेच पदवी महाविद्यालयातील १११ विद्यार्थ्यांच्या सहभागासह घेण्यात आली. १७ ऑक्टोबर २०२१ रोजी यामधून ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली, जे १८ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेल्या दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले.

**स्पर्धांच्या भरमारीत पुढील गोष्टींचा समावेश होता**

संगीत विभाग : भारतीय शास्त्रीय गायन सोलो, इंडियन लाइट व्होकल सोलो, वेस्टर्न व्होकल सोलो, नाट्यसंगीत व्होकल सोलो, इंडियन इंन्स्ट्रुमेंटल, वेस्टर्न इंन्स्ट्रुमेंटल

साहित्य विभाग : वक्तृत्व, कथा लेखन

थिएटर विभाग : एकपात्री अभिनय

ललित कला विभाग : ऑन स्पॉट पेंटिंग, पोस्टर मेकिंग,

कार्टूनिंग, क्ले मॉडेलिंग, रांगोळी, कोलाज

नृत्य विभाग : भारतीय शास्त्रीय नृत्य, कोणताही विक्रमी नृत्य

स्पर्धकांच्या अप्रतिम प्रतिभेने आणि ऊर्जेने भरलेल्या कामगिरीव्यतिरिक्त या स्पर्धांचे वैशिष्ट्य म्हणजे महाविद्यालयाच्या यशात भर घालण्याचा इतिहास असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनीच या स्पर्धांचे परीक्षण केले. तर माध्यम विभागाच्या पहिल्या वर्षातील विद्यार्थी आयुष सोमण याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी स्वीकारली आणि त्यांच्या अतिशय संबंधित आणि वास्तववादी कल्पनांनी सर्वांना आनंदित केले.

स्पर्धांच्या दुसऱ्या फेरीनंतर १८ नोव्हेंबर २०२१ रोजी समापन सत्र आणि पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे प्रभारी प्रा. रोहित बापट यांनी केले. त्यांनी स्पर्धकांना पुढील स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी केवळ प्रोत्साहनच दिले नाही तर आगामी विजेत्यांना युवा महोत्सवाच्या आगामी प्रवासासाठी मोठी स्वप्ने पाहण्याची आणि त्याचे विजयात रूपांतर करण्याची जबाबदारी स्वीकारण्याची आठवण करून दिली. यानंतर पदवी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.महेश पाटील सर यांचे मार्गदर्शन लाभले. टॅलेंट अकादमी आतापर्यंतचा प्रवास, माजी विद्यार्थ्यांनी बाहेरच्या जगात मोठे पराक्रम गाजवलेला पाहून त्याला अभिमान वाटला. त्यांनी प्रत्येकाला आठवण करून दिली की हे स्वतःला प्रयत्नपूर्वक पॉलिश करण्यासाठी आणि लक्ष केंद्रित करून ध्येयाकडे वाटचाल करण्याचे हे व्यासपीठ आहे. कार्यक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. संगीता दीक्षित मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. दीक्षित मॅडम या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी असून गेल्या ३३ वर्षांपासून त्या महाविद्यालयात अध्यापन करत आहेत. अशा प्रकारची प्रतिभा आणि सहभाग वर्षानुवर्षे सातत्यपूर्ण आहे आणि वरच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि टॅलेंट अकादमीच्या शिक्षकांमध्ये सर्व सहभागींमध्ये प्रेरणा आणि चैतन्य निर्माण करत असल्याचे पाहून तिला अभिमान वाटला. यानंतर बक्षीस कार्यक्रम झाला.

**सामाजिक जबाबदारी विभागाचे दत्तक गाव टाकी पठार येथे दहा दिवस**

दत्तक गाव टाकीपठार येथे जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या वतीने २७ नोव्हेंबर २०२१ ते ०९ डिसेंबर २०२१ या कालावधीत दहा दिवसांच्या DSR चे आयोजन करण्यात आले होते. सदर उपक्रम हा महाविद्यालयाच्या N.S.S. समिती द्वारे आयोजित केला होता. संपूर्ण कार्यक्रम हा 'समुदाय सहभाग कार्यक्रम' या विषयवार आधारित होता त्यात महाविद्यालयातील इच्छुक विभाग आणि समिती प्रमुखांना उपक्रमाचे नियोजन करण्याची संधी देण्यात आली होती.

टाकी पठार येथे पार पडलेल्या या दहा दिवसीय उपक्रमात राज्यशास्त्र विभाग आणि व्यवसाय कायदा विभाग यांनी २८ नोव्हेंबर रोजी दत्तक घेतलेल्या 'गाव टाकी पठार' गावातील आश्रम शाळेत जाऊन तेथील मुलांची भेट घेतली. या संपूर्ण कार्यात महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांचे मोलाचे सहकार्य मुलांना लाभले. त्यांनतर २९ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयाच्या तत्त्वज्ञान विभाग आणि मानसशास्त्र विभागातर्फे आश्रम शाळेत वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

टाकी पठार गावातील आश्रमशाळेला दिलेली ही भेट हा NSS चा अभिनव उपक्रम दर वर्षी आयोजित केला जातो, विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव तसेच त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्राचार्य

डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाने असे उपक्रम राबवले जातात.

**दहा दिवस ISR**

के. जी. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्सच्यावतीने २७ नोव्हेंबर २०२१ ते ९ डिसेंबर २०२१ या कालावधीत टाकी पठार आश्रमशाळेत दहा दिवसीय ISR आयोजित करण्यात आला. के.जी. जोशी कॉलेज ऑफ आर्टस् आणि एन.जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स (ऑटोनॉमस), ठाणे संस्थात्मक सामाजिक जबाबदारी (ISR) साठी वचनबद्ध आहे. एक संस्था म्हणून आमचा विश्वास आहे की, आमचे ध्येय विद्यार्थ्यांना ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करण्यापलीकडे आहे. सामाजिक बदलाचा एक सक्रिय एजंट म्हणून, संस्था समाजात सामाजिक जबाबदारीची संस्कृती वाढवण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे स्वयंसेवी उपायांमध्ये गुंतलेली आहे जी तिच्या स्वतःच्या स्पर्धात्मक हितसंबंध आणि समाजाचे कल्याण या दोन्हींसाठी सेवा देते. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण होते.

ISR चे मुख्य उद्दिष्ट हे होते की, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, मूल्ये आणि पर्यावरणास जबाबदार वर्तन विकसित करणे आणि नैतिक, नैतिक आणि सामाजिक मूल्ये असलेले नागरिक म्हणून विद्यार्थ्यांचे पालनपोषण करणे जेणेकरून उपक्रमांद्वारे समाजाला सेवा प्रदान करणे आणि समाजाप्रती त्यांचे कर्तव्य पार पाडणे. सामाजिक विकासासाठी आमच्या जबाबदारीबद्दल विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचीही त्यांची इच्छा होती.

दत्तक गाव टाकी पठारच्या विकासासाठी उपक्रम, योजना राबविणे.

ISR मध्ये अनेक विभागांनी सक्रिय सहभाग घेतला, B.Com विभाग (लेखा आणि वित्त) ने मुलांमध्ये विविध महत्त्वाच्या सरकारी ओळखपत्र आणि आर्थिक कार्डांबद्दल जागरूकता निर्माण केली आणि BMS विभागाने विद्यार्थ्यांना साप आणि शिडीची चटई मुलांसाठी भेट म्हणून दिली. आराम. प्लेसमेंट सेलच्या वतीने १२वी नंतरचे करिअर या विषयावर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

राज्यशास्त्र विभागाने मुलांना भारतीय राज्यघटना, प्रास्ताविका याविषयी समजावून सांगून संविधानाविषयी जागृती निर्माण केली आणि त्यांनी त्यासाठी पोस्टरही बनवले. तत्त्वज्ञान विभागाच्या वतीने इयत्ता ५ वी आणि ६ वी च्या लहान मुलांसाठी प्रेरक गीत पठणाचे आयोजन करण्यात आले होते. इंग्रजी विभागाने मुलांना पत्रलेखन, महत्त्वाच्या प्रश्नांसह प्रश्नपत्रिका नमुने समजून घेण्यास मदत करून त्यांना शैक्षणिक मार्गाने मदत केली. मास मीडिया विभागाने मुलांना मीडियाच्या विविध संधी समजून घेण्यात आणि सार्वजनिकपणे कसे बोलावे हे समजून घेण्यात मदत केली आणि त्यांच्यासोबत काही मजेदार खेळही खेळले.

WDC ने मासिक पाळीच्या स्वच्छतेवर स्किट्सचे आयोजन केले आणि विद्यार्थ्यांना योग आणि त्याचे फायदे याबद्दल जागरूक केले. भूगोल विभागाने विद्यार्थ्यांना बियाणे बँका आणि स्वदेशी नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाचा प्रचार आणि प्रबोधन केले. अकाऊंटन्सी विभागाने विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहारातील तोट्यावरील नफ्याच्या गणनेबद्दल शिक्षित केले. BVoc विभाग, कौशल्य विकास समितीने ५वी आणि ६वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी पेपर क्विलिंग ज्वेलरी कार्यशाळेचे आयोजन केले होत. मानसशास्त्र विभागाने मूलभूत भावनांबद्दल जागरूकता निर्माण केली आणि विद्यार्थ्यांना भीती, राग किंवा दुःख यासारख्या नकारात्मक भावनांना

तोंड देण्यासाठी सोप्या तंत्राने सुसज्ज केले. विद्यार्थ्यांनी सोपी उदाहरणे, गाणी, पोस्टर्स इत्यादींद्वारे भावना जाणून घेतल्या. माहिती संकलनाशी संबंधित आणखी एक उपक्रम विभागाकडून इयत्ता ९वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. चिंता, नैराश्य आणि तंदुरुस्ती यासारख्या विविध स्केलवर १९० विद्यार्थ्यांचा डेटा गोळा करण्यात आला. हा प्रकल्प कृती संशोधन म्हणून पुढे नेण्याची आणि या विद्यार्थ्यांसाठी काही मनोवैज्ञानिक हस्तक्षेपांची योजना आखण्याची विभागाची योजना आहे

सर्ज कमिटीने मराठी विभागाच्या सहकार्याने जलसंधारण, कोरोना, पर्यावरण चळवळ, महिला हक्क, शिक्षणाचा हक्क या सामाजिक विषयांवर स्किट इम्प्रोव्हायझेशन ॲक्टिव्हिटी आयोजित केली. मराठी विभागाने आपल्या जीवनातील कलाकृतींचे महत्त्व या विषयावर भाषणे आयोजित केली होती, त्यांनी विद्यार्थ्यांसाठी कविता कार्यशाळाही आयोजित केली होती जिथे त्यांनी विद्यार्थ्यांना प्रभावीपणे कविता कशी वाचावी आणि समजून घ्यावी हे शिकवले.

संस्कृत विभागाने विद्यार्थ्यांना संस्कृतच्या मूलभूत गोष्टींवर कार्यशाळा आयोजित केली होती आणि त्यांना विविध नर्सरी यमक आणि खेळ शिकवले होते.

दहा दिवसांचा ISR विविध उपक्रमांनी भरलेला होता आणि ते केवळ समन्वयामुळे आणि विद्यार्थी स्वयंसेवकांच्या प्रचंड पाठिंब्यामुळे शक्य झाले. या दहा दिवसांच्या ISR ने टाकीपठार आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना संविधानावरील व्याख्यान असो किंवा पेपर क्विलिंग ज्वेलरी वर्कशॉप यावर विचार करायला आणि तयार करण्यासाठी खूप काही दिले, यामुळे त्यांना तयार होण्याची आणि वाढण्याची एक नवीन आशा मिळाली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) व स्पर्धापरीक्षा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय नौदल दिनाचे औचित्य साधून Awareness of Various Entries in Defense Services या विषयावर ४ डिसेंबर२०२१ रोजी पतंजली सभागृहात एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी यावेळी निवृत्त कॅप्टन रमेश टोपे यांनी डिफेन्समधील संधी याबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला. CDS ( Combined Defence Service), AFCAT ( Air Force Common Admission Test), NDa (National Defence Academy), CAPF (Central Armed Police Force) अशा विविध परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमाला १११ जणांनी सहभाग नोंदवला. प्रश्नोत्तरांच्या सत्रात त्यानी सर्वांच्या शंकांचे निरसन केले.







बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागातर्फे ४ डिसेंबर २०२१ रोजी भारतीय नौदल दिनाच्या निमित्ताने ऑनलाइन प्रश्न मंजुषा घेण्यात आली.

या प्रश्नमंजूषा मध्ये ६९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

### महिला सबलीकरण

बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालयाच्या Department of Lifelong Learning and Extension (DLLE)आणि Human Science विभागातर्फे २१ डिसेंबर २०२१ रोजी महिला सबलीकरण या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी कॅप्टन डॉ. रोहिणी शिवबालन यांनी मार्गदर्शन केले. महिला सबलीकरणाचा अर्थ त्यानी समजावून सांगितला. महिलांचे सबलीकरण करण्याकरता स्त्रीभ्रूण हत्या रोखाने, मुलींचे शिक्षण यावर भर देणे आवश्यक आहे हे नमूद केले. या कार्यक्रमाला ७२ जणांनी आपली उपस्थिती नोंदवली.



## विद्या प्रसारक मंडळाचे<br>ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय


### विद्यापीठाच्या परीक्षा

१ डिसेंबर, २०२१ पासून दुसऱ्या सहामाही विद्यापीठाच्या परीक्षा सुरू झाल्या. परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आल्या. तांत्रिक समस्या असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त परीक्षाही घेण्यात आल्या होत्या.

### आझादी का अमृत महोत्सव

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाने पॅन इंडिया कायदेशीर जागरूकता आणि आउटरीच कार्यक्रम जाहीर केला होता. आमच्या महाविद्यालयाने कार्यक्रमात सक्रिय भूमिका घेतली, आणि २, ऑक्टोबर ते १४, नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत विविध उपक्रम राबविले. ८, डिसेंबर रोजी आम्ही भारताच्या सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना फोटोसह उपक्रमांचा तपशीलवार अहवाल पाठवला. डिसेंबरअखेरपर्यंत त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद आम्हाला ऐकू आलेला नाही.

दिनांक १० डिसेंबर २०२१ रोजी संरक्षण दलाचे प्रमुख श्री. बिपीन रावत यांच्या श्रद्धांजलीचा कार्यक्रम महाविद्यालयाने आयोजित केला होता. गूगल मीट या आभासी मंचावरून हा कार्यक्रम ठेवण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी व वायुसेनेचे सैनिक श्री. सुभाष कुमार, विद्यार्थिनी मिस. सोनिया मिश्रा आणि प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी श्री. रावत यांच्याविषयी माहिती दिली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी श्री. रावत यांना श्रद्धांजली वाहिली.




### सहसंचालकांनी बोलावलेल्या बैठका

लसीकरण मोहिमेसाठी, प्राचार्य आणि सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरणे आणि नागरी सेवांमध्ये विद्यार्थ्यांच्या भविष्याला चालना देण्यासाठी पनवेल

बुद्धीच्या कॅमेऱ्यात विचारांचे रोल टाकून प्रयत्नाचे बटन दाबल्याशिवाय भविष्याचा सुंदर फोटो निघत नाही.

विभागाचे माननीय सहसंचालक यांनी विविध बैठका बोलावल्या होत्या. या बैठकांमध्ये प्रभारी प्राचार्य सहभागी झाल्या होत्या.

### JBC वक्तृत्व स्पर्धा

राज्यशास्त्र विभाग आणि WDC द्वारे आयोजित वक्तृत्व स्पर्धा १७ डिसेंबर, २०२१ शुक्रवार सकाळी ११.०० वा. ते – १२.०० वाजेपर्यंत होती. आपल्या विधी महाविद्यालयाची तृतीय वर्ष विधीची विद्यार्थिनी मिस. सोनिया मिश्रा हिला प्रथम पारितोषिक मिळाले.

### ॲड ऑन प्रमाणपत्र प्रोग्राम

विधी महाविद्यालयाने सप्टेंबर ते डिसेंबर २०२१ साठी जाहीर केलेल्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची पहिली बॅच पूर्ण झाली. प्राणी संरक्षण कायदा यासाठी २९ विद्यार्थी आणि मीडिया आणि कायदा यासाठी २ विद्यार्थी होते. निवडणूक कायद्यासाठी नावनोंदणी होत होती. ग्रंथपाल श्रीमती. शीतल सोनावणे आणि सहाय्यक प्रा. मिस. हेतल मिशेरी या संयोजक होत्या. जानेवारी महिन्यात प्रमाणपत्रे दिली जातील. कार्यक्रम प्रभावीपणे आयोजित केल्याबद्दल रिसोर्स पर्सन श्री. मीत आशर आणि श्रीमती रीना पिल्लई आमच्या सर्व अभिनंदनास पात्र आहेत.

### बार कौन्सिल ऑफ इंडिया

आमच्या महाविद्यालायचे अंतिम वर्षाचे विद्यार्थी श्री. दिव्यांशू दीक्षित जे दिल्लीत आहेत त्यांना आमच्या महाविद्यालयाची मान्यता प्रलंबित मंजुरींबद्दल चौकशी करण्यासाठी बार कौन्सिल ऑफ इंडिया कार्यालयात भेट देण्याची विनंती करण्यात आली. श्री दीक्षित यांनी आमच्याशी फोनवरून अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि आम्ही एप्रिल २०१९ पासून आमच्या प्रलंबित प्रकरणाबद्दल त्यांची समजूत काढली.




### मानपाडा आरोग्य केंद्र

प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना २३, डिसेंबर रोजी ठाणे मानपाडा आरोग्य केंद्रातील वैद्यकीय आणि पॅरा मेडिकल कर्मचाऱ्यांच्या निःस्वार्थी कार्याचा सत्कार करण्यासाठी प्रमुख पाहुण्यांपैकी एक म्हणून आमंत्रित करण्यात आले. डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना सर्व नागरिकांच्यावतीने आणि वैयक्तिकरीत्या सर्व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्याची ही दुर्मीळ संधी मिळाली.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

१) विद्या प्रसारक मंडळाच्या 'TMC Law College, ठाणे' व 'District Legal Services Authority', ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने २ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर

२०२१ रोजी PAN India Legal Awareness and Outreach Compaign आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या भागात ''आजादी का अमृत महोत्सव'' या विषयांतर्गत पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी "Short Film Making Competition" चे आयोजन केले. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील द्वितीय वर्ष इन्स्ट्रुमेन्टेशन विभागातील ढवळे चारवाक अशोक (Dhawale Charwak Ashok) या विद्यार्थ्याला ८ नोव्हेंबर २०२१ झालेल्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले.

२) IIC (२०२०-२१) इन्व्होवेशन सेल, VPM's Polytechnic, ठाणेला २०२०-२१च्या उद्योजकता व स्टार्टअपचे वातावरण तंत्रनिकेतनाली विद्यार्थी वर्गात विविध उपक्रमाने आयोजित करण्यासाठी ४ स्टारचे मानांकन मिळाले. डॉ. उषा राघवन या IIC Cell, VPM's Polytechnic च्या अध्यक्ष आहेत.

३) ISTE Chapter (२०२१-२२) व्ही. पी. एम. पॉलीटेक्निकच्या वतीने प्रथम वर्षीय डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी "Pollution Control" या विषयावर पोस्टर तयार करण्याची स्पर्धा (१४ डिसेंबर) आयोजित केली. विद्यार्थ्यांचा या स्पर्धेला चांगलाच प्रतिसाद मिळाला.

तृतीय वर्षीय डिप्लोमा इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांसाठी "Environmental Issues and Preventive Measures" या विषयावर पॉवर पॉईंटने सादरीकरणाचा एक कार्यक्रम ६ डिसेंबर ते १४ डिसेंबरला आयोजित केला. विद्यार्थ्यांनी विविध पर्यावरणावर संभाव्य असलेले धोके व त्यांचे सुनियोजित पद्धतीने निर्मूलन यावर उत्तम पद्धतीने सादरीकरण केले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृतता व त्याचे संवर्धन हा मुख्य हेतू या प्रकल्पाचा होता.

**''अटल रँकिंग ऑफ इन्स्टिट्युशन अचिवमेंटस्''**




MOE (Ministry of Education, भारत सरकार), AICTE व Innovation Cell यांच्या संयुक्त विद्यमाने ''अटल रँकिंग ऑफ इन्स्टिट्युशन अचिवमेंटस्'' चा निकाल जाहीर झाला. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाला "Promising" या श्रेणीमध्ये मानांकन प्राप्त झाले. सौ. राजश्री पाटील व सौ. गौतमी पुजारे यांनी या मानांकनासाठी विशेष प्रयत्न केले. सदर प्रशस्तीपत्रक दि. २९/१२/२००१ रोजी प्रदान करण्यात आले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**डिसेंबर २०२१ मधील कार्यक्रम / वार्ता**


१ डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली यांनी २०२०-२१ तुकडीतील खालील विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

एम एम एस-वित्त शाखेतील कु. नेहाली परब, कु. प्रियांका माने, कु. रुतुजा पवार आणि कु. प्रियांका कदम यांना डेसिमल पॉइंट ॲनालिटिक्स, येथे ३.८

अखंड यशाने आपल्या जीवनाची केवळ एकच बाजू कळते. दुसरी बाजू कळण्यासाठी अपयशाची जरुरी असते!

लाख वार्षिक पगाराची, संशोधन सहयोगी (रिसर्च असोसिएट) आणि आर्थिक विश्लेषक या पदाची संधी मिळाली, तर श्री. हृषिकेश पार्टे आणि श्री. शुभम जगताप, यांना इंसिन्क अनॅलिटीक्स येथे ३.५ लाख वार्षिक पगाराची, आर्थिक विश्लेषक या पदाची संधी मिळाली.

२ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आय. आय. सी. समितीच्यावतीने, वि. प्र. म.च्या आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन अकादमीचे प्राध्यापक आणि अधिष्ठाता डॉ. सुधाकर आगरकर यांचे ''प्रेरक नवकल्पना'' – ''वैज्ञानिक शोध ज्याने जागतिक अर्थशास्त्र बदलले'' या विषयावर एक वेबिनार आयोजित करण्यात आले.




३ डिसेंबर : डॉ. कांचन यांनी पीएचडी विद्यार्थ्यांसाठी ''ओव्हरव्यूव्ह, रिसेन्ट ट्रेंड्स अँड करंट रिसर्च टॉपिक्स इन एच आर'' या विषयावर एक सत्र आयोजित केले.

४ डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली यांना हैदराबाद सिंध बोर्डाच्या एच. आणि जी. एच. मनसुखानी इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट येथे ''रिसेन्ट ट्रेंड्स इन ऑपरेशन्स अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट'' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.


९ डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली यांनी 'आयसीईटीएमसीटी २०२१' मटेरियल्स, कॉम्प्युटिंग आणि कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीज' या विषयावरील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत ''द ट्रान्सफॉर्मेशन ऑफ बिसनेसेस अँड द सोसायटी विथ द इन्फ्लुएन्स ऑफ डेटा सायन्स'' हा शोधनिबंध सादर केला.


ANNAI VAILANKANNI COLLEGE OF ENGINEERING

CERTIFICATE OF PRESENTATION

This is to certify that MAHESH MANOHAR BHANUSHALI of VPM'S DR.V.N.BEDEKAR INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, has presented a paper entitled THE TRANSFORMATION OF BUSINESS AND THE SOCIETY WITH THE INFLUENCE OF DATA SCIENCE in the Second International Conference on Emerging Trends in Materials, Computing and Communication Technologies 'ICETMCCT 2021' Organized by ANNAI VAILANKANNI COLLEGE OF ENGINEERING, AVK Nagar, Pottalkulam during December 9, 2021 and December 10, 2021.

९ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आय आय सी समिती तर्फे, रेडिमेड गारमेंट आणि फॅशन इंडस्ट्रीच्या आधुनिक स्वरूपाचे प्रणेते श्री. दिनेश सिंघल यांचे ''माझी कथा – यशस्वी उद्योजकाचे प्रेरणादायी सत्र'' या विषयावर एक वेबिनार आयोजित करण्यात आले.




१० डिसेंबर : विद्यार्थी समिती तर्फे ''ब्रिम्स कनेक्ट'' या मासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१३ डिसेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर, डॉ. स्मिता जपे आणि प्रा. संदीप मोघे यांनी १३ ते १८ डिसेंबर २०२१ या कालावधीत एम एम एस २०२१-२३ च्या नवीन

---

आयुष्यात काय करायचे हे ठरविण्यात वेळ वाया घालवू नका, नाहीतर तुम्ही काय करायचे हे तीच वेळ ठरवेल!

तुकडीसाठी उद्घाटन तसेच प्राथमिक/पायाभूत (फाऊंडेशन) कार्यक्रमाचे आयोजन केले.




एम एम एस २०२१-२३ तुकडीच्या पायाभूत कार्यक्रमा दरम्यान आयोजित करण्यात आलेली सत्रे.


शैक्षणिक आचार - डॉ. स्मिता जपे

अर्थविषयक बारकावे - डॉ. स्मिता जपे


संवाद कला - डॉ. कांचन अक्षय

डी २ सी (D2C) : डेटा क्रिएटिंग डिफरन्स - डॉ. मीनाक्षी मल्होत्रा



१६ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या ग्रंथालय आणि आयआयसी समिती तर्फे पेटंट आणि डिझाइनचे सहाय्यक नियंत्रक (गट 'अ' राजपत्रित अधिकारी), पेटंट कार्यालय भारत, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय मुंबईचे डॉ. ठाकूर अजय सदाशिव, यांचे आयपीआरशी संबंधित एक मनोरंजक अतिथी सत्र आयोजित करण्यात आले.




१८ डिसेंबर : श्री. मनीष पाटील यांचे ''प्रॉब्लेम सॉलविंग अँड आयडिएशन'' या विषयावर अतिथी सत्र आयोजित करण्यात आले. आयआयसी समितीच्या सदस्या म्हणून डॉ. स्मिता जपे यांनी कार्यशाळेचे समन्वयन केले.




२२ डिसेंबर : वि.प्र.म.च्या जोशी बेडेकर महाविद्यालयातर्फे अनुदान मंजुरीसाठी संशोधन प्रस्तावाला अंतिम स्वरूप देण्यासाठी बैठक घेण्यात आली, या वेळी डॉ. स्मिता जपे यांना संशोधन सल्लागार समितीच्या सदस्य म्हणून आमंत्रित केले होते.




आयुष्य म्हणजे पत्त्यांचा खेळ, चांगली पाने मिळणे आपल्या हातात नसते, पण मिळालेल्या पानांवर चांगला डाव खेळणे यावर आपले यश अवलंबून असते!

२२ व २३ डिसेंबर : श्री. संजय सपकाळ यांनी खालील राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी KOHA प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले.

सहाय्यक आयुक्त कार्यालय, समाजकल्याण, ठाणे यांच्या अधिनस्त असलेल्या ८ वसतिगृहातील (कल्याण-२, भिवंडी-२, उल्हासनगर-२, ठाणे-१, शहापूर-१) ग्रंथालयात कोहा प्रणाली यशस्वीरीत्या प्रस्थापित करून झालेली आहे. त्या संदर्भात तेथील गृहपाल यांना कोहा या ग्रंथालय प्रणालीचे प्रशिक्षण दि. २२ व २३ डिसेंबर २०२१ रोजी विप्रमंचे डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे येथे संगणक कक्षामध्ये आयोजित करण्यात आले. ग्रंथालय सहकारी सौ. दीपाली हिंदळेकर व श्री. स्वप्निल पवार यांनी देखील प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.



२३ डिसेंबर : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, डॉ. कांचन अक्षय, प्रा. सिद्धेश सोमण आणि दीपाली हिंदळेकर यांनी ''स्वरांजली''चे आयोजन केले. यामध्ये प्राध्यापक, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी सहभागी झाले आणि त्यांनी आपल्या प्रतिभेचे सादरीकरण केले.




२३ डिसेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर यांना बी एन बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे त्यांच्या आय क्यू ए सी सदस्यांचे, प्रशिक्षण घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.




२८ डिसेंबर : डॉ. नीतिन जोशी यांना एमजीएमटीच्या सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट येथील एलआयसी, पीएचडी संशोधन केंद्रासाठी तज्ज्ञ मंडळ सदस्य म्हणून नामांकन मिळाले.


२९ डिसेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी ब्रिम्सच्या पीएचडी विद्यार्थ्यांसाठी एक सत्र आयोजित केले.

२९ डिसेंबर : डॉ. स्मिता जपे यांनी बीएमए तर्फे आयोजित श्री. अजित कामत यांच्या ''बिझनेस स्टोरी टेलिंग'' या सत्रात भाग घेतला.





३० डिसेंबर : डॉ. नीतिन जोशी यांना पिल्लई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेचे विषय तज्ज्ञ म्हणून नामांकन मिळाले.

३० डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली यांनी ब्रिम्सच्या पीएचडी विद्यार्थ्यांसाठी ''मेट्रिक्स युस्ड टू मेजर द क्वालिटी ऑफ रिसर्च अँड ओव्हरव्ह्यू, रिसेन्ट ट्रेंड्स करंट रिसर्च टॉपिक्स इन ऑपरेशन्स मॅनेजमेंट अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट'' या विषयावर एक सत्र आयोजित केले.



३० डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली यांनी ''ऑटोमोबाईल इंजिनअरिंग फंडामेंटल्स'' या विषयावर अभियांत्रिकी संदर्भ पुस्तक लिहिले, नोशन प्रेस तर्फे प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचा ISBN क्रमांक - ९७९-८८८५४६५७०० आहे.




डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांचा ''असेसिंग अडॉप्शन ऑफ इलेक्ट्रिक व्हेइकल्स इन इंडिया : द मेडिएटिंग रोल ऑफ गव्हर्नमेंट पॉलिसीज'' या शीर्षकाचा शोधनिबंध आता Q2 आणि 'h'- इंडेक्स २६ असलेल्या EJTIR या नियतकालिकामध्ये प्रकाशनासाठी स्वीकारण्यात आला आहे.

•••

(पृष्ठ क्र. १८ वरून - **ब्रह्मसूत्रे**)

**समारोप**

ब्रह्मसूत्रांतून वेदान्तातील, उपनिषदातील तत्त्वज्ञान मांडलेले आहे व हिंदू धर्माचे आणि संस्कृतीचे व अलीकडच्या काळातील हिंदू विचारधारा व वैदिक परंपरा चालवणाऱ्या, रामकृष्ण मिशनसारख्या संस्थांच्या कार्यासाठी पाया घालून ठेवलेला आहे असे म्हणता येईल.

ब्रह्मसूत्रांचा स्वतःचा असा संदेश म्हणजे, विश्व हे ब्रह्माचेच व्यक्त रूप आहे व सर्व सृष्टी, पर्यावरण, विश्वातले सर्व प्राणीजगत व मुख्य म्हणजे मानवी समाज इत्यादी सर्व ब्रह्माचीच व्यक्त रूपे आहेत. हे आपण नीट समजून घ्यायला हवे. त्याचा आपल्यासाठी अर्थ हाच की, ते मनात ठेवून, माणसाने सर्व व्यवहार केले तर त्याच्या हातून सृष्टीची, पर्यावरणाची हानी होणे थांबू शकेल. माणसाला इतर माणसांशी व्यवहार करताना त्याच्या मनात ही जाणीव जागी राहिली तर परस्पर प्रेमाची वागणूक वाढत राहील व सर्वांची उन्नती साधली जाऊन या पृथ्वीवरच स्वर्ग अवतरला असे म्हणता येईल.

**– डॉ. हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर**
बी २-२० सरिता वैभव,
सिंहगड रोड,
पुणे-४११०३०
दूरध्वनी : ०२०-२४२५०४२७/
२९५२०४२७
Email - hdkopardekargmail.com

•••

आयुष्य हे असंच जगायचं असतं; आपल्याकडे जे नाही त्यावर रडत बसण्यापेक्षा जे आहे त्याचा सुयोग्य वापर करा; जग अपोआप सुंदर बनतं.

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

त्याची निवड करण्यात आली होती. या इमारतीच्या रचनेवर भारतातील इतर अनेक प्रसिद्ध वास्तुच्या रचनेची छाप पडलेली आपल्याला दिसते. इंडो-सारासेनिक (Indo Sarascenic) वास्तू रचनेनुसार या इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला आहे.चौकोनी आकाराच्या इमारतीवर एक घुमट उभा केला आहे. हे पाहून विजापूर येथील गोलघुमटाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

या इमारतीत वस्तू प्रदर्शित करण्यासाठी मुबलक जागा उपलब्ध आहे. सर्व मिळून सुमारे ७०००० वस्तू या संग्रहालयात असाव्यात असा अंदाज आहे. या सर्व वस्तू वेगवेगळ्या दालनात पद्धतशीरपणे प्रदर्शित करून ठेवल्या आहेत. त्यातील एक दालन आहे ते दगडी मूर्त्यांचे. येथे देशाच्या वेगवेगळ्या भागांतून आणलेल्या दगडी मूर्त्या ठेवलेल्या आहेत. दुसरे दालन आहे ते वेगवेगळ्या धातूंच्या वस्तूंचे. टेराकोटाच्या अनेक वस्तू भारताच्या वेगवेगळ्या भागात बनविल्या जातात. या वस्तूंचा एक मोठा संग्रह एका दालनात आहे. एका दालनात हस्तिदंताच्या, तर दुसऱ्या दालनात चिनी मातीच्या वस्तू प्रदर्शित केल्या आहेत. वेगवेगळ्या राजवटीतील नाणी एका दालनात पद्धतशीरपणे लावून ठेवलेल्या आहेत. देशात अनेक ठिकाणी उत्खनन करण्यात आले. त्यात सापडलेल्या अनेक वस्तू या संग्रहालयात ठेवण्यात आल्या आहेत. विशेषत: सिंधू नदीच्या खोऱ्यात केलेल्या उत्खननात सापडलेल्या दुर्मीळ वस्तू येथे पाहायला मिळतात. थोडक्यात सांगायचे झाले तर हे संग्रहालय अनेकविध वस्तूंनी परीपूर्ण असेच आहे. एकदा भेट देऊन संग्रहालय पाहून झाले असे होत नाही. त्यासाठी पुन्हा पुन्हा भेट देऊन वेगवेगळी दालने पाहणे आवश्यक आहे.

विविध वस्तूंचा संग्रह लोकांना उपलब्ध करून देणे एवढाच उद्देश या संग्रहालयाचा नाही. इथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्मरणात राहील असा अनुभव देण्याचा संग्रहालयाचा प्रयत्न असतो. त्यासाठी ते शाळा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रयोग दिग्दर्शन सत्रे (Lecture Demonstration) आयोजित करतात. त्याचबरोबर शिक्षकांसाठी या संग्रहालयात कृतिसत्रे आयोजित करण्यात येतात. पुरातत्त्व शास्त्रात काम करणाऱ्या संशोधकांना येथे मार्गदर्शन करण्यात येते. या संस्थेतर्फे संशोधन करण्यासाठी शिष्यवृत्ती देखील देण्यात येते. ज्यांना प्रत्यक्ष मुंबई शहरात येऊन हे संग्रहालय पाहणे शक्य नाही त्यांच्यासाठी फिरते संग्रहालय निर्माण करण्यात आले आहे. शतकांपूर्तीच्या निमित्ताने अनेक ज्ञानवर्धक कार्यक्रमाचे आयोजन करण्याची संग्रहालयाची योजना आहे. मुंबई आणि मुंबई जवळ राहणाऱ्या लहानथोर अशा सर्व मंडळींनी या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावा असे मी आवाहन करू इच्छितो.

**डॉ. सुधाकर आगरकर**

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*

**०२२-२५४२ ६२७०**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा

❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण

❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.